दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

जिथे गाव.. तिथे वार्ताहर..!

महाराष्ट्रात सातारा सांगली कोल्हापूर रायगड सिंधुदुर्ग

जिल्हा,तालुका,शहर आणि ग्रामीण भागामध्ये

पत्रकार /वार्ताहर,छायाचित्रकार आणि जाहिरातदार नेमनेआहेत.

दैनिक जनप्रभात सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

7875613619,883006884

या लोकप्रिय वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

पात्रता

१. समाजसेवेची आवड
२. जनसंपर्क
३. स्मार्ट फोन असणे आवश्यक
४. सोशल मीडियाचा वापर करता येणे

जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

✻ (आष्टी) वर्धा ✻ शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६ ✻ वर्ष ४ थे ✻ अंक ९३ ✻ पृष्ठ ६ ✻ मूल्य ५.०० RNI NO : MAHAR/2022/82242

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 12 किल्ल्यांचे जागतिक वारसा प्रमाणपत्र युनेस्कोकडून मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी स्वीकारले

युनेस्को मुख्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन

मुंबई, दि. 12 : छत्रपती शिवाजी महाराजांच्या 12 किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. त्यासंदर्भातील युनेस्कोचे अधिकृत प्रमाणपत्र सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी युनोस्कोच्या फ्रान्स येथील कार्यालयात जाऊन स्वीकारले. यूनेस्को मुख्यालयामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे उभारण्यात आलेल्या भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळ्यास मंत्री ॲड. शेलार यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. दीड वर्षांच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर गतवर्षी 11 जुलै 2025 रोजी, यूनेस्कोच्या 47व्या अधिवेशनात, 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया' या नावाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील 12 किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आले. या मानांकनाचे अधिकृत प्रमाणपत्र महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. शेलार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पॅरिस येथे स्वीकारले. छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमणाशी लढून उभारलेल्या हिंदवी स्वराज्याचे रक्षण, सुरक्षित शासनव्यवस्था आणि लोककल्याण, यासाठी साकारलेली गड-किल्ल्यांची साखळी हा भारतीय इतिहासातील अद्वितीय लष्करी व राज्यकारभाराचा नमुना मानला जातो. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूमधील जिंजी असा 12 किल्ल्यांचा समूह "जागतिक वारसा स्थळ"



म्हणून संपूर्ण जगासमोर उभा राहिला आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी 2025 मध्ये मंत्री ॲड. शेलार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाचे चार सदस्यीय प्रतिनिधीमंडळ पॅरिसमध्ये युनेस्कोसमोर तांत्रिक आणि धोरणात्मक मांडणी करून या मानांकनासाठी सादरीकरण आणि युक्तिवाद करून आले होते. आता प्रत्यक्ष मानांकन-पत्र मिळाले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पराक्रमाचा आणि मराठा साम्राज्याच्या वारशाचा जागतिक सन्मान स्वीकारताना आज ऊर भरून आला आहे. या संपूर्ण प्रक्रियेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले मार्गदर्शन आणि परिश्रम तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या योगदानाबद्दल मंत्री ॲड. शेलार यांनी आभार मानले आहेत. भारताचे युनेस्कोमधील स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा यांनीही परिश्रमपूर्वक केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांचेही तमाम महाराष्ट्रातर्फे मंत्री ॲड.शेलार यांनी आभार मानले. तसेच हा महाराष्ट्रासाठी, देशासाठी शिवप्रेमींसाठी गौरवाचा क्षण असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

भारत संविधानाला 75 वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळा युनेस्को मुख्यालयाला भेट दिला असून, 26 नोव्हेंबर 2025 रोजी संविधान दिनानिमित्त या पुतळ्याची स्थापना पॅरिसमध्ये युनेस्को मुख्यालयात झाली आहे. सामाजिक न्याय, समानता, बंधुता आणि शिक्षणाद्वारे सक्षमीकरण यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली शिकवण ही युनेस्कोच्या मुलभूत ध्येयाशी सुसंगत आहे. पॅरिसमधील त्यांच्या या स्मारकाला मंत्री शेलार यांनी अभिवादन केले. यावेळी विशाल शर्मा यांच्यासह विभागाचे डॉ. सचिव किरण कुलकर्णी, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक हेमंत दळवी आणि मान्यवर उपस्थित होते.

"लागवडपूर्व तंत्र, हमखास यशाचा मंत्र" वेबिनारचा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा कृषी विभागाचे आवाहन

गोंदिया प्रतिनिधी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत गावांमध्ये हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सदर तंत्रज्ञानाचा अवलंब करावा या उद्देशाने प्रकल्पामार्फत हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब वाढविण्यासाठी प्रकल्प गावामध्ये "हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान" राबविण्यात आहे. खरीप हंगामातील तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अवलंब मे किंवा जून महिन्यात होत असला तरी, त्याची पूर्वतयारी फेब्रुवारी महिन्यापासून करणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचे महत्व पटवून देऊन त्यांचा दृष्टीकोन बदलण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो. बेड मेकर/ पेरणी यंत्रे, जैविक निविष्ठा आणि इतर साधनांची उपलब्धता वेळेत करता येते. तसेच क्षेत्रीय अधिकारी, कृषिताई आणि



समूह सहाय्यक यांना तंत्रज्ञानाचे सखोल ज्ञान देऊन ते प्रत्यक्ष गाव पातळीवर मोहीम राबविण्यासाठी तयार होतील. त्यासाठी प्रकल्पामार्फत फेब्रुवारी पासून सदर तंत्रज्ञानाबद्दल ऑनलाईन वेबीनार व डिजिटल शेतीशाळा घेण्यात येणार आहे. या मोहिमेचा भाग म्हणून दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी, सकाळी ११ ते दु.१२.३० या वेळेत "लागवडपूर्व तंत्र, हमखास यशाचा मंत्र" या विषयावर दूरस्थ पद्धतीने युट्युब लिंकद्वारे वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे. हा वेबिनार प्रकल्पाच्या Youtube https://www.youtube.com/@PoCRAMaharashtra वर थेट प्रक्षेपित केला जाणार आहे. शेतकरी बंधू-भगिनी, कृषिताई, महिला शेतकरी, बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे सभासद आणि वाड्या-पाड्यातील कास्तकार, शेतकरी कुटुंबे – गटाने एकत्र बसून मोबाईल किंवा मोठ्या स्क्रीनवर वेबिनार नक्की पहा. असे आव्हाहन निलेश रा. कानवडे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गोंदिया , नोडल अधिकारी शेरान पठाण ना.दे .कृ .सं .प्रकल्प, अमोल राऊत, सिद्धार्थ सोमकुवर व कृष्णकुमार गहगये यांनी केलेले आहे.

मत्स्यव्यवसायात एआय तंत्रज्ञान; मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली 'मत्स्यवाणी' व्हॉईस गव्हर्नन्स प्लॅटफॉमबाबत चर्चा

मुंबई, दि. १२ : मत्स्यव्यवसाय प्रशासनात आमूलाग्र सुधारणा, महसूल वृद्धी आणि इंटेलिजन्स प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने "मत्स्यवाणी" – एआय तंत्रज्ञानावर आधारित भारतातील पहिला व्हॉईस गव्हर्नन्स प्लॅटफॉर्म राबविण्याचा प्रस्ताव मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सादर करण्यात आला. मत्स्यव्यवसाय क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासन अधिक परिणामकारक, जलद आणि पारदर्शक करण्यावर भर देण्यात येत आहे. "मत्स्यवाणी" प्लॅटफॉर्ममुळे शासकीय यंत्रणा, मच्छीमार व उद्योग यांच्यातील



संवाद सुलभ होऊन महसूल वृद्धीसोबतच सशक्त शासकीय प्रणाली प्रस्थापित होईल, असे मंत्री राणे यांनी सांगितले. बैठकीत मच्छीमार समुदायांसाठी जलसुरक्षा उपाययोजना अंतर्गत पर्यावरणीय जलजनक तंत्रज्ञानाचा (हवेतील आद्रतेपासून जल तयार करणे) पायलट प्रकल्प राबविण्याबाबतही चर्चा झाली. तसेच "महाराष्ट्र एकात्मिक किनारी, सीमा व जिल्हा वैज्ञानिक अंमलबजावणी व सुरक्षा अभियान" या प्रस्तावावर सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. तटीय सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी आवश्यक धोरणात्मक उपायांवरही बैठक झाली. मंत्री राणे यांनी नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून मत्स्यव्यवसाय क्षेत्रात शाश्वत विकास आणि सागरी सुरक्षेला प्राधान्य देण्याचे निर्देश दिल. या बैठकीस मत्स्यआयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, डवेल लाईफ सायन्स प्रा.लि.चे संचालक वैभव ढसाळ तसेच संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

अपात्र ठरलेल्या ९०० संस्थांवर विभागाची कारवाई; दिव्यांग क्षेत्रातील संस्थांसाठी नोंदणी बंधनकारक – सचिव तुकाराम मुंढे

संस्थांनी २८ फेब्रुवारीपर्यंत संकेतस्थळावर नोंदणी पूर्ण करणे आवश्यक

मुंबई, दि. १२ : राज्यात दिव्यांग व्यक्ती अधिनियम अंतर्गत दिव्यांगांसाठी कार्यरत संस्थांना दिव्यांग कल्याण आयुक्त यांच्याकडे नोंदणी असणे अनिवार्य आहे. राज्यात साधारणत: दोन हजारांहून अधिक संस्था दिव्यांगांच्या कल्याणासाठी कार्यरत आहेत. यापैकी सुमारे ९०० संस्था विविध कारणांमुळे अपात्र ठरल्याने त्यांच्यावर विभागाने कारवाई करून त्यांची नोंदणी रद्द केली असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले. विशेष म्हणजे सन २०२५ या वर्षातच ३६३ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. नोंदणी रद्द केलेल्या संस्थांमध्ये कोकण ५२, नाशिक ४९, पुणे ६०, नागपूर ४९, अमरावती ५० आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील १०३ संस्थांचा समावेश आहे. सचिव तुकाराम मुंढे म्हणाले, संस्था सोसायटी नोंदणी कायदा १८६०, बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायदा,१९५० किंवा कंपनी कायदा (कलम ८) अंतर्गत नोंदणीकृत असल्यानंतरसुद्धा दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ५० अंतर्गत नोंदणी बंधनकारक आहे. विभागाने केलेल्या कारवाईमुळे शासनाचा निधी योग्य संस्थांवर खर्च होईल. ज्या संस्था दिव्यांग क्षेत्रात कार्यरत आहेत किंवा कार्य करू इच्छितात त्यांनी दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे.



अशा सर्व संस्थांनी २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत https://divyangkalyan.maharashtra.gov.in / या संकेतस्थळावर नोंदणी पूर्ण करणे आवश्यक आहे. नोंदणी न केल्यास संबंधित संस्थांवर अधिनियमातील कलम ९१ नुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले आहे. सचिव मुंढे म्हणाले, दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व नागरी समाज संघटनांच्या, संस्थांच्या कामकाजात एकसमानता यावी. तसेच त्यांची जबाबदारी आणि सेवांची गुणवत्ता सुनिश्चित करणे, नागरी समाज संघटना, संस्थांची नोंदणी, तपासणी, देखरेख, नूतनीकरण, जबाबदारी व पारदर्शकता निश्चित करण्यासाठी कार्यप्रणाली १७ ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आली आहे. यानुसार संस्थांनी शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सुगम्यता तत्त्वे व इतर मानकांचे पालन करणे आवश्यक आहे. दिव्यांग कल्याण विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आरोग्य, कौशल्य विकास, व्यावसायिक प्रशिक्षण, पुनर्वसन, संशोधन व विकास, शिक्षण-प्रशिक्षण किंवा दिव्यांगांच्या कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सर्व संस्थांनी शासनाने निश्चित केलेल्या निकषांचे पालन करून दिव्यांग कल्याण विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रणालीद्वारे नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी. यादवारे दिव्यांग व्यक्तींची प्रतिष्ठा, हक्क आणि सुरक्षा यांचे संरक्षण होईल आणि त्यांना सन्मानजनक आयुष्य जगता येईल.

संस्थांनी दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडे नोंदणी केल्यामुळे त्यांच्यामार्फत दिव्यांग व्यक्तींचे सक्षमीकरण व पुनर्वसन करणे शक्य होईल. हे कार्य करताना दिव्यांगांच्या हक्कांचे, अधिकारांचे उल्लंघन होणार नाही व त्यांना न्याय दिला जाईल याबाबत दक्षता घेतली जाईल. त्यामुळे सर्व संस्थांनी नोंदणी करून, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार त्याअंतर्गत नियमावली व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या योजना व धोरणानुसार कार्य करणे अपेक्षित आहे. जेणेकरून दिव्यांगांचे पुनर्वसन व सक्षमीकरण साध्य करणे शक्य होईल, असेही सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

संपादकीय...

व्हॅलेंटाईन भारतीय संस्कृती व एक संकट. प्रेम म्हणजे खेळ नव्हे.....

(राहुल पवार) कराड

भारतीय संस्कृती आणि आचार विचार त्याच्यामध्ये पाश्चातीकरण दिवसेंदिवस वाढत आहे. व्हॅलेंटाईन म्हणजे एक दिवसाचे प्रेम आणि त्या प्रेमातून भावना व्यक्त करण्याचा दिवस खरंतर प्रेम हे कृती विचारातून निर्माण होते. हल्लीच्या काळामध्ये प्रेम या नावावर भावनेवर प्रयोग केला जातो. प्रेम आणि अनैतिकतेच्या सामाजिक प्रदर्शन मानले जाते सोशल मीडियाचा वापर हल्लीचे मुले करतात व तिथेच भावनेची घुसमट होते विशेष करून कुमारवयीन मुली .....कुमारवयीन मुलांचे वय हे 'आयडेंटिटी व्हर्सेस कन्फ्युजन' या द्वंद्वाचे वय असल्याचे मानसशास्त्रज्ञ एरिक एरिकसन म्हणतो. या वयात व्यक्ती 'मी कोण?' याचा शोध घेत असते. आपल्या क्षमता कोणत्या? आपल्या मर्यादा कोणत्या? आपल्या आवडीनिवडी कोणत्या याचा शोध घेत असते. हा शोध कुमारांनी जाणीवपूर्वक घ्यावा, असे सांगण्याचा माझा प्रयत्न असतो. माझी व्याख्यान देण्याची पद्धत थोडी खेळीमेळीची असते. प्रश्न विचारून, विनोद करून मी मुलांना विचार करायला प्रवृत्त करतो.गेल्या आठवडय़ात मी एका शाळेत बोलत होतो. मी मुलांना म्हटले, 'तुम्ही ज्या वयात आहात त्या वयात तुम्ही एक शोध घेत असता. कोणता शोध ते तुम्ही सांगाल का?' मी हा प्रश्न विचारात वर्गाच्या उजव्या बाजूला बघत होतो. त्यावर डाव्या बाजूच्या मुलांच्यातून काॅमेंट आली, 'मुलींचा!' त्यावर अख्खा वर्ग हसायला लागला. माझे खेळीमेळीत बोलण्याचे टेक्निक माझ्याच अंगलट आले होते. दुसरे झाले होते असे की माझ्यासमोर साठ मुले बसवण्यात आली होती. शिवाय मुलांना खुलेपणाने बोलता यावे म्हणून मी त्यांच्या शिक्षकांना वर्गात थांबवले नव्हते. त्यामुळे एका बाजूला मुले जास्त, त्यात नेहमी वचक ठेवणारे शिक्षक नाहीत आणि मी त्यांच्याशी खेळीमेळीने बोलत होतो. एक क्षण मला वाटले की अख्खे लेक्चर आता वाया जाणार! काय करावे ?मी त्या कमेंटवरच बोलू लागलो. मी म्हटले, 'हो. बरोबर आहे. या वयात तुम्ही मुलींचा शोध घेता. पण का घेता? काय आहे या मागची भावना?' त्या मुलाला माझा हा प्रश्न अनपेक्षित होता. त्यालाच काय, वर्गातील सगळ्याच मुलांना हा प्रश्न अनपेक्षित होता. त्याचवेळी आणखी एक काॅमेंट आली, 'शुक्रवारी व्हॅलेंटाईन!''हो. बरोबर. पण व्हॅलेंटाईन का साजरा करतात रे?' मी विचारले.'त्या दिवशी मुलीला प्रपोज करतात आणि गिफ्ट देतात!' मागून आणखी एकाचा आवाजमाझ्या आवडीचा महिना कारण व्हॅलेन्टाइन आठवडा.. मी प्रत्येक गोष्टीत रसिक असल्याने माझ्यासाठी आनंद घ्यायला आणि द्यायला एक क्षणही पुरतो आणि मी भरभरून जगतेही.. व्हॅलेन्टाइन आला कि प्रेमविराना प्रेमाचं भरतं येतं म्हणजेच बहर येतो असं म्हणुयात.. प्रेम ही आठवडाभर करण्याची कृती नसून तो जगण्याचा सोहळा आहे.. प्रेम म्हणजे अनुभूती आहे.. प्रेम सगळ्याना मिळत नाही.. अनेकजण प्रेमासाठी तडफतात त्यामुळे त्याची चेष्टा करु नका आणि पार्टनरला गृहीतही धरु नका.. प्रत्येक गोष्टीसाठी प्रत्येक क्षणी कृतज्ञता व्यक्त करा.. प्रेम ही मिळवण्याची नाही तर अनुभवण्याची प्रोसेस आहे.. आधी द्या मग मिळेल.. एक काका काकु वयवर्षे जवळपास ७०, काकु काकाना म्हणतात , काय ही फॅंड.. व्हॅलेन्टाइन आठवडा म्हणे.. त्यावर काका म्हणतात , अगं आपल्या वेळी एवढा अवेअरनेस नव्हता पण प्रेम होतच कि.. प्रेमाचं रुप बदललय इतकच काय ते.. तु रोज सकाळी प्रेमाने डबा द्यायचीस ना.. दुपारी कपड्याना इस्त्री करुन ठेवायचीस.. फक्त आय लव्ह यु मी कधी म्हणालो नाही.. पण त्यामुळे काही अडलं का ??.. त्यावर काकु मात्र संतापल्याच आणि म्हणाल्या , शब्द हे भावना व्यक्त करायला असतात सरकार.. सरकार हा शब्द ऐकल्यावर काकांच्या तोंडातली कवळी बाहेर आली आणि काकू हसत सुटल्या.. तु अशीच हसत रहा गं.. पण मी काय म्हणतो कुसुम , आपण आता या मुलांसारखा व्हॅलेन्टाइन डे साजरा करायचा का ??.. आपण डेट वर जाऊ.. आईस्क्रीम खाऊ. तुला साडी घेउ.. आणि गुलाबाचं काय ??.. सरकार जोरातच म्हणाल्या , तुम्ही मला म्हणाले होते , तुला सोन्याचं गुलाब देइन.. काकांची कवळीच नाही बुबुळही बाहेर आली असतील.. कारण सोनं दिढलाखाच्या घरात गेलं आणि चांदी तर आता फक्त दातात आणि केसात नाही तर गगनाला भिडली आहे.. काकानी जरा सारवासारव केली आणि म्हणाले , पुढच्या वर्षी नक्की सोन्याचं गप्रेम म्हणजे खेळ नव्हे.. माझ्या आवडीचा महिना कारण व्हॅलेन्टाइन आठवडा.. मी प्रत्येक गोष्टीत रसिक असल्याने माझ्यासाठी आनंद घ्यायला आणि द्यायला एक क्षणही पुरतो आणि मी भरभरून जगतेही.. व्हॅलेन्टाइन आला कि प्रेमविराना प्रेमाचं भरतं येतं म्हणजेच बहर येतो असं म्हणुयात.. प्रेम ही आठवडाभर करण्याची कृती नसून तो जगण्याचा सोहळा आहे.. प्रेम म्हणजे अनुभूती आहे.. प्रेम सगळ्याना मिळत नाही.. अनेकजण प्रेमासाठी तडफतात त्यामुळे त्याची चेष्टा करु नका आणि पार्टनरला गृहीतही धरु नका.. प्रत्येक गोष्टीसाठी प्रत्येक क्षणी कृतज्ञता व्यक्त करा.. प्रेम ही मिळवण्याची नाही तर अनुभवण्याची प्रोसेस आहे.. आधी द्या मग मिळेल.. एक काका काकु वयवर्षे जवळपास ७०, काकु काकाना म्हणतात , काय ही फॅंड.. व्हॅलेन्टाइन आठवडा म्हणे.. त्यावर काका म्हणतात , अगं आपल्या वेळी एवढा अवेअरनेस नव्हता पण प्रेम होतच कि.. प्रेमाचं रुप बदललय इतकच काय ते.. तु रोज सकाळी प्रेमाने डबा द्यायचीस ना.. दुपारी कपड्याना इस्त्री करुन ठेवायचीस.. फक्त आय लव्ह यु मी कधी म्हणालो नाही.. पण त्यामुळे काही अडलं का ??.. त्यावर काकु मात्र संतापल्याच आणि म्हणाल्या , शब्द हे भावना व्यक्त करायला असतात सरकार.. सरकार हा शब्द ऐकल्यावर काकांच्या तोंडातली कवळी बाहेर आली आणि काकू हसत सुटल्या.. तु अशीच हसत रहा गं.. पण मी काय म्हणतो कुसुम , आपण आता या मुलांसारखा व्हॅलेन्टाइन डे साजरा करायचा का ??.. आपण डेट वर जाऊ.. आईस्क्रीम खाऊ. तुला साडी घेउ.. आणि गुलाबाचं काय ??.. सरकार जोरातच म्हणाल्या , तुम्ही मला म्हणाले होते , तुला सोन्याचं गुलाब देइन.. काकांची कवळीच नाही बुबुळही बाहेर आली असतील.. कारण सोनं दिढलाखाच्या घरात गेलं आणि चांदी तर आता फक्त दातात आणि केसात नाही तर गगनाला भिडली आहे.. काकानी जरा सारवासारव केली आणि म्हणाले , पुढच्या वर्षी नक्की सोन्याचं गुलाब .. काकूनी स्मितहास्य केलं आणि म्हणाल्या , आय लव्ह यु.. मी गम्मत करत होते हो.. पण आपण बागेत जाऊ बसू आणि प्रेमयुगुलं काय काय करतात त्याचा आनंद मात्र घेउ कारण ती अनुभवण्याची गोष्ट आहे.. किती सुंदर ना.. रमलात ना तुम्हीही ??.. माझा तर रोजच व्हॅलेन्टाइन असतो..कधी कृष्णासोबत.. कधी प्राणी , पक्षासोबत.. कधी मित्रांसोबत तर कधी मी केलेल्या प्रसादासोबत.. स्पर्श न करता प्रेम अनुभवुन पहा आणि रोजच व्हॅलेन्टाइन डे साजरा करा..एकमेकांना भेटत रहा



सुजलाम सुफलाम... सूर लोपल्याची खंत!

[13 फेब्रुवारी: विश्व रेडिओ दिवस.]



"सुजलाम् सुफलाम् मलयज शितलाम्; शस्य शामलाम् मातरम्, वन्दे मातरम् !" असे सकाळचे मंगल सूर आज हरवले आहे, असे वाटते. एकेकाळी रेडिओ हा आपल्या जीवनाचा एक महत्वाचा भाग मानला जात होता. कारण माहिती, संवाद आणि गाण्यांच्या माध्यमातून मनोरंजनाचे महत्वपूर्ण माध्यम म्हणून रेडिओचा उपयोग केला जात होता. मात्र, आज सर्वत्र नवनवीन माध्यमे आली आणि रेडिओचा वापर कमी झाला. दरवर्षी १३ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक रेडिओ दिवस' म्हणून साजरा केला जातो. परंतु टेलिव्हिजन आणि मोबाईलचा शोध लागल्यानंतर रेडिओचा वापर कमी झाला. मात्र, आजूनही रेडिओचे महत्व कमी झालेले नाही. जागितक रेडिओ दिनाच्या निमित्ताने त्यासंदर्भातील संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी सादर करत आहेत... संपादक. जगभरातील लोकांना शिक्षित करण्याबरोबरच आजपर्यंत माहितीची देवाणघेवाण आणि रेडिओने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. तसेच रेडिओ हे पत्रकारांसाठीसुद्धा एक महत्वाचे व्यासपीठ म्हणून उदयास आले आहे. रेडिओ हे माहिती पसरविण्याचे सर्वात शक्तिशाली साधन आहे. १३ फेब्रुवारी १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघात रेडिओचे पहिल्यांदा प्रसारण झाले. त्यामुळे हा दिवस जागतिक रेडिओ दिन म्हणून साजरा केला जातो. पहिला जागतिक रेडिओ दिन औपचारिकपणे २०१२मध्ये साजरा करण्यात आला होता. जागतिक रेडिओ दिन २०२२ची थीम ''एवोलूशन- द वर्ल्ड इज ऑलवेज चेंजिंग'' होती. म्हणजेच विकासाबरोबर जगाचाही विकास होत आहे. थीम रेडिओची लवचिकता आणि टिकाऊपणा दर्शवते. याचा अर्थ जग जसजसे बदलत आहे, तसे रेडिओमध्येही नावीन्यता येत आहे. तरी आजही तो काळ आठवतो जेव्हा आपण रेडिओ ऐकून आनंदीत व्हायचो.



संकलन व सुलेखन - श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी. रामनगर वॉर्ड, गडचिरोली. फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

जागतिक रेडिओ दिवस दरवर्षी १३ फेब्रुवारी रोजी जगभरात साजरा केला जातो. या दिवशी दरवर्षी युनेस्को जगातील सर्व प्रसारक, संस्था आणि समुदायांच्या सहकार्याने विविध कार्यक्रम आयोजित करीत असतो. संवादाचे माध्यम म्हणून रेडिओच्या भूमिकेवर चर्चा करून लोकांना त्याबद्दल जागरूक केले जाते. रेडिओ ही जगभरातील माहितीची देवाणघेवाण करणारी सेवा आहे. आपत्ती किंवा आपत्कालीन परिस्थितीत रेडिओचे महत्त्व वाढते. अशा परिस्थितीत जगभरातील तरुणांना रेडिओची गरज आणि महत्त्वाची जाणीव करून देणे, हा जागतिक रेडिओ दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. माहितीचा प्रसार करण्यासाठी रेडिओ हे सर्वात शक्तिशाली आणि स्वस्त माध्यम म्हणून ओळखले जाते. रेडिओ हे युगानुयुगे असले तरी त्याचा वापर संवादासाठी केला जात आहे. जागतिक रेडिओ दिवस कधी आणि का सुरू झाला? सन २०११ साली जागतिक रेडिओ दिनाची सुरुवात झाली. सन २०१०मध्ये स्पॅनिश रेडिओ अकादमीने प्रथमच १३ फेब्रुवारी हा जागतिक रेडिओ दिवस म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला. युनेस्कोच्या सदस्य देशांनी सन २०११मध्ये हा प्रस्ताव स्वीकारला आणि हा जागतिक रेडिओ दिवस म्हणून घोषित केला. नंतर सन २०१२मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेनेही ते स्वीकारले. त्यानंतर त्याच वर्षी १३ फेब्रुवारी रोजी युनेस्कोने प्रथमच जागतिक रेडिओ दिवस साजरा केला. याच दिवशी जागतिक रेडिओ दिन साजरा करण्याचे एक खास कारण आहे. वास्तविक, संयुक्त राष्ट्र रेडिओ १३ फेब्रुवारी १९४६ रोजी सुरू झाला. संयुक्त राष्ट्र रेडिओच्या वर्धापनदिनानिमित्त जागतिक रेडिओ दिवस साजरा केला जाऊ लागला. रेडिओ म्हणजे काय? रेडिओ म्हणजे एक असे यंत्र, जे विजेचा वापर करून इलेक्ट्रोमॅग्नेटिक तरंगे तयार करते, ज्यांच्या द्वारे संदेशाची देवाणघेवाण केली जाते. इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्ह पाठवणाऱ्या रेडिओला ट्रान्समीटर तर तरंगे म्हणजेच वेव्ह स्वीकारून त्याचे रूपांतर आवाजात करणाऱ्या रेडिओला रिसीव्हर असे म्हटले जाते. रेडिओ ३०० एचझेड इतक्या क्षमतेने इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्ह तयार करू शकते. जगातला पहिला रोडिओ इटलीचे शास्त्रज्ञ मार्कोनी यांनी बनवला. सन १८९५मध्ये त्यांनी रेडिओचा शोध लावला आणि त्याचे पेटंटही मिळवले. मार्कोनीला फादर ऑफ रेडिओ असेही म्हणतात. इंग्रजांनी आणि अनेक युरोपीयन देशांनी हे तंत्रज्ञान आपापल्या वसाहतीत नेले. याच माध्यमातून अमेरिका, आफ्रिका, आशिया खंड आणि ऑस्ट्रेलिया असा रेडिओचा प्रसार झाला. त्या काळी हे माध्यम प्रामुख्याने कम्युनिकेशनसाठी वापरले जात होते. विशेषतः युद्धकाळात बातम्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी, अनेक खेळांच्या कॉमेंट्रीसाठी रेडिओचा वापर होऊ लागला. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातही ब्रिटिशांनीच रेडिओ आणाला. दि.२३ जुलै १९२७ रोजी मुंबई आणि कलकत्ता येथे ऑल इंडिया रेडिओ नावाची दोन केंद्रे सुरू झाली. त्यानंतर सन १९३२मध्ये भारत सरकारने भारतीय प्रसारण सेवा नावाचा एक विभाग सुरू केला. सन १९३६मध्ये त्याचे नाव ऑल इंडिया रेडिओ- एआईआर असे ठेवण्यात आले. दरम्यान, सन १९२०चे दशक येता येता रेडिओला व्यावसायिक स्वरुप प्राप्त झाले. तसेच सन १९५०पर्यंत रेडिओ लोकप्रिय झाला होता. भारतातही रेडिओची सुरुवात सन १९२०च्या दशकात झाली. दि.२३ जुलै १९२७ रोजी मुंबईतून रेडिओ प्रसारण सेवा सुरू झाली. तसेच इंडियन ब्रॉडकास्टींग कंपनी लिमिटेडने मुंबई आणि कोलकता येथे रेडिओ स्टेशन सुरू केले. परंतु सन १९३०मध्ये ही कंपनी बंद पडली. त्यानंतर सरकारने ही कंपनी आपल्या ताब्यात घेत त्याला इंडियन स्टेट ब्रॉडकास्टींग सर्विस असे नाव दिले. त्यानंतर दि.८ जून सन १९३६मध्ये त्यांचे ऑल इंडीया रेडीओ असे नामकरण करण्यात आले. तसेच सन १९५६मध्ये पुन्हा याचे नाव बदलत आकाशवाणी करण्यात आले. हळूहळू आकाशवाणीचे जाळे देशभर पसरू लागले. आज २३ भाषांमध्ये ४१५ रेडिओ स्टेशनसह ऑल इंडीया रेडीओ ही जगातल्या सर्वात मोठ्या रेडिओ प्रसारण सेवेपैकी एक बनली आहे. तसेच सन २००१मध्ये भारतात खासगी रेडिओ स्टेशनलासुद्धा सुरुवात झाली होती. रेडिओ हे सर्वात जुने माध्यम असले तरी, संवादाचे एक महत्त्वाचे माध्यम म्हणून त्याच्याकडे बघितले जाते. सन १९४५मध्ये आजच्याच दिवशी संयुक्त राष्ट्र संघात रेडिओचे पहिले प्रसारण झाले होते. त्यामुळे हा दिवस 'जागतिक रेडिओ दिवस' म्हणून साजरा केला जातो. स्पेन रेडिओ अकादमीने सन २०१०मध्ये 'जागतिक रेडिओ दिवस' साजरा करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर युनेस्कोच्या ६७व्या सत्रात १३ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक रेडिओ दिवस' म्हणून घोषित करण्यात आला. युनेस्कोच्या या निर्णयाला संयुक्त राष्ट्रसंघाने दि.१४ जानेवारी २०१३ रोजी मान्यता दिली. दरवर्षी युनेस्कोद्वारे जगभरातील रेडिओ प्रसारक आणि संघटनांनाच्या मदतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तसेच संवादाचे माध्यम म्हणून रेडिओच्या भूमिकेवरसुद्धा चर्चा केली जाते. यावर्षी जागतिक रेडिओ दिवसाला 'रेडिओ आणि विविधता' ही थीम देण्यात आली आहे. तसेच विकास, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि संपर्क असे सबथीम सुद्धा देण्यात आले आहे.!! समस्त श्रोत्यांना जागतिक रेडिओ दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

गैर प्रकार ..

सत्तेसाठी साटेलोटे
किती हो गैर प्रकार
असंगाशी संग करी
वेगळा घेतो आकार

अ घटित काही घडे
मनाला जडे विकार
जावे हव्या त्या थरा
स्वप्नकराया साकार

सहज ये सापळ्यात
सावजबनते शिकार
साम दाम न् दंडभेद
वापरे सर्व अधिकार

उपलब्ध सहज कैक
गैर मार्ग ते चिक्कार
मतदाते ते अचंबित
मनात करे धिक्कार

साळसूद ते गुन्हेगार
कसे होई निर्विकार
सर्वपक्षीय संमिलित
कोणकरेल प्रतिकार

सत्ता ऐश्वर्य भोगाया
मनस्थिती रे भिकार
समिकरणे जुळवता
बनवे लंगडे सरकार

जनमतकौल बाजूस
आडवे येते अपकार
जन सेवा सर्वतोपरी
इतके करा उपकार

- हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996

पुरुष ..

दृष्टी विचित्र आगळी
पाहताना पुरूषांकडे
किती तो गाजावाजा
पुरूष संस्कृतीचं पुढे

दोषसारा पुरुषांचाचं
घडता कुठेही लफडे
प्रथमदर्शनी आरोपी
उतरवले जाई कपडे

छापेमारी संशयास्पद
नेमके मर्द का सापडे
बाप्यांचे फोटो सटाट
स्त्रियांचे झाके मुखडे

घटस्फोटां जबाबदार
करी संसाराचे तुकडे
पोटगी द्यायची त्यांनी
हतबल पुनश्च बापडे

रे पुरूष अत्याचारांचे
फुगले आकडे केवढे
किती माजे अवडंबर
कसे दोष पर्वतातेवढे

कैकवर्षे पुरूषवर्गाने
अन्याय केले रे एवढे
काळाचा न्याय योग्य
भले कुणास रे नावडे

नरनारी समानअसून
उगाचं विषया चिवडे
बदलतो आहे वाराही
परिवर्तनाचे न वावडे

- हेमंत मुसरीफ पुणे
9730306996

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व त्यागमुर्ती माता रमाई संयुक्त जयंती सोहळा संपन्न

कारंजा प्रतिनिधी (सिध्दार्थ सोमकुवर)

सावित्रिबाई फुले व त्याग मुर्ती माता रमाई यांची संयुक्त जयंती रमाई महिला मंडळ व भारतीय बौद्ध महासभा महीला शाखा कारंजा घा. तर्फे अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आयु.सुनिताताई तायडे ,मुख्य मार्गदर्शक आयु.डॉ .स्मिताताई करनाके, प्रमुख पाहुणे म्हणून आयु.संगीताताई डोंगरे,आयु.डॉ.वंदनाताई रामटेके ,आयु.उज्वलाताई वैद्य, आयु.सुनंदाताई खोब्रागडे,रमाई महिला मंडळाच्या सचिव आयु.बबिताताई शेंडे, कोषाध्यक्ष, वनिताताई सोमकुवर,उपस्थित होत्या.उपस्थित पाहुण्यांनी महीलांना कॅन्सरसारख्या आजाराला न घाबरता वेळीच निदान करून घेतले तर आजाराला अटकाव करू शकतो असे सांगून मार्गदर्शन केले ,मुलांवर प्रत्येक महीलेनी सुसंस्कार करण्याची गरज आहे असे सांगून अशा प्रकारच्या विषयांवर मार्गदर्शन केले. . याप्रसंगी सुत्रसंचलन मयुरी शै.शेंडे , प्रास्ताविक सुनिताताई दाभने तर आभारप्रदर्शन करूणाताई गोडबोले यांनी केले.कार्यक्रमाला रमाई महिला मंडळाच्या सदस्या तसेच भारतीय बौद्ध महासभेच्या सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.



जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242

दिल्लीतील प्रजासत्ताक दिन चित्ररथ स्पर्धेत महाराष्ट्र प्रथम; वाईची रणरागिणी अमरीन इनामदारचा मोलाचा वाटा

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते वाईत भव्य सत्कार

वाई प्रतिनिधी : प्रशांत थोरवे

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्ली येथे झालेल्या भव्य चित्ररथ स्पर्धेत महाराष्ट्र राज्याच्या टीमने देशात प्रथम क्रमांक पटकावून राज्याचा मान उंचावला. या यशस्वी टीममध्ये वाई शहराची रणरागिणी अमरीन इनामदार हिचा अत्यंत मोलाचा वाटा असून तिच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे वाई शहराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.दिल्लीतील कर्तव्यपथावर सादर करण्यात आलेल्या महाराष्ट्राच्या चित्ररथाने राज्याची सांस्कृतिक परंपरा, इतिहास आणि आधुनिक प्रगती यांचे आकर्षक दर्शन घडवले. या चित्ररथाच्या सादरीकरणात अमरीन इनामदार हिने घेतलेली मेहनत, सादरीकरणातील आत्मविश्वास आणि समर्पण भाव यामुळेच महाराष्ट्राला देशात प्रथम क्रमांक मिळवता



आला, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.या अभिमानास्पद कामगिरीबद्दल गुरुवारी वाई शहरात अमरीन इनामदार हिचा भव्य सत्कार करण्यात आला. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भारत सरकारचे केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री सन्माननीय रामदासजी आठवले साहेब यांच्या हस्ते अमरीनचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना मंत्री आठवले यांनी अमरीनच्या जिद्दीचे आणि कर्तृत्वाचे कौतुक करत, "वाईसारख्या शहरातील मुलीने राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. अशा तरुणींमुळे देशाची आणि राज्याची ओळख अधिक भक्कम होते," असे गौरवोद्गार काढले. तसेच तिच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष अशोक बापू गायकवाड, बाजीगर भाई इनामदार, नूतन वाई पंचायत समिती सदस्य स्वप्नील गायकवाड यांच्यासह विविध मान्यवर, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी अमरीन इनामदार हिच्या यशाचे कौतुक करत तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.वाई शहरातील एका तरुणीने राष्ट्रीय पातळीवर झेंडा रोवल्यामुळे संपूर्ण शहरात आनंदाचे वातावरण असून, अमरीन इनामदार ही आज वाईच्या तरुणाईसाठी प्रेरणास्थान ठरली आहे. तिच्या या यशामुळे वाई शहराचे नाव देशपातळीवर उजळले असून, भविष्यातही ती अशाच प्रकारे यशाची नवी शिखरे सर करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

महाराष्ट्र सरकारची बेपर्वाई,

३८ वर्षानंतर जमीन मालकाला मिळाला न्याय

दै जनप्रभात उरण तालुका प्रतिनिधी (विठ्ठल ममताबादे) उरण दि ११ राज्य शासनाच्या दुर्लक्ष आणि कागदपत्रे जपण्याच्या बेपर्वा कारभारामुळे एखादया सामान्य नागरीकाला त्याचा कायदेशीर हक्क मिळण्यासाठी कसा दीर्घकाळ संघर्ष करावा लागतो याचे उदाहरण म्हणजे रायगड जिल्हयातील दापोली येथील एका शेतकऱ्याला त्याची जमीन सरकारने भुसंपादन केल्यानंतर मिळणाऱ्या विकसित भुखंडाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी त्याला ३८ वर्षे प्रतीक्षा करावी लागली आहे. ती पण फक्त सरकारी कागदपत्रे गायब झाल्यामुळे.चेतन कांती कुडवकर (पनवेल, रायगड) यांची दापोली, तालुका पनवेल येथील जमीन १९८६ मधे संपादीत करण्यात आली होती. या संपादनाबद्दलच्या "अवार्ड" ची प्रत उपलब्ध नसल्याने सिडकोच्या १२.५% विकसीत



भुखंडाच्या योजने अंतर्गत त्यांना मिळायचा विकसित भुखंड मिळु शकत नव्हता. त्या करीता त्यांनी महाराष्ट्र शासन व इतर विरूद्ध बॉम्बे हायकोर्टात रिट याचीका दाखल केली होती.सरकारतर्फे डेप्युटी कलेक्टर (लँड एक्विझिशन) कार्यालयाने एका शपथपत्रात कबुली केली की अवार्डची मुळ प्रत कार्यालयात सापडत नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार जुने कागदपत्र खोक्यांमधे ठेवले होते व कोर्टाच्या आदेशाने ते खोके जप्त झाल्यामुळे कागद जमिनीवर पडले होते. त्यांच्याकडे कागद स्कॅन करण्यासाठी अर्थसाहाय्यही नव्हते.हायकोर्टाच्या खंडपीठाने (न्यायमुर्ती मनीष पितळे आणि श्रीराम व्ही. शिरसाट) निर्णय देताना सरकारी कार्यालयाने "महाराष्ट्र सार्वजनिक नोंदी कायदा, २००५ चे उल्लंघन केल्याचे नमुद करून अवार्ड पुनर्बाधण्याचे आदेश दिले." त्याच बरोबर सिडकोला अवार्ड नसतानाही इतर कागदोपत्री पुराव्याच्या आधारे कुडवकर यांचा अर्ज ६ आठवडयात निकाली काढण्याचे आदेश दिले.कोर्टाने सरकारी कार्यालयांच्या बेपर्वा वृत्तीवर तीव्र टीका केली व "सार्वजनीक नोंदी योग्य रीतीने जतन न करणे ही सरकारची निष्काळजीपणाची निशाणी आह". असे न्यायाधीशांनी म्हटले आहे. चेतन कांती कुडवकर यांची उच्च न्यायालयामधे बाजु मांडण्याचे काम ऍड.कुणाल दत्तात्रेय नवाळे यांनी यशस्वीपणे केले.

श्री गुरुबुद्धिस्वामी महाविद्यालय पूर्णा 12 वी उच्च माध्यमिक परीक्षा केंद्र पोलीस बंदोबस्ता सह सुरळीत सुरुवात झाली.

परभणी ,(अरविंद कांबळे)

पूर्णा:

आज दिनांक 10 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता श्री गुरुबुद्धिस्वामी महाविद्यालय पूर्णा येथे 12 वी उच्च माध्यमिक शालांत परीक्षा पोलीस बंदोबस्ता सह सुरळीत सुरुवात झाली.केंद्र प्रमुख म्हणून प्रा. गंगाधर साखरे म्हणून काम पाहत आहेत.आज परीक्षा केंद्राला पूर्णा उप विभागीय पोलीस



अधिक्षक डॉ. समाधान पाटील यांनी आज परीक्षा केंद्राला भेट देऊन केंद्राची पाहणी केली. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. राजकुमार, कनिष्ठ मा.पर्यवेक्षक मिटकरी उमाशकर उपप्राचार्य प्रा.डॉ. शिवसाब कापसे, प्रा.डॉ. गजानन कुरूदकर उप्राचार्य प्रा.राजेश बाहेती प्रा. डॉ. राजू शेख कार्यालयीन अधीक्षक बाळासाहेब कुलकर्णी तसेच बंदोबस्ताला आलेले पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

कै. अजय दिंगबर थोरवे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सातवे मोफत रक्तदान शिबिर; मोरया रे ग्रुपचा पुढाकार

वाई प्रतिनिधी (प्रशांत थोरवे)

व्याहळी कॉलनी गावातील सर्वांचा लाडका व समाजशील तरुण कै. अजय दिंगबर थोरवे यांच्या सातव्या पुण्यस्मरणानिमित्त मोरया रे ग्रुप, मित्रपरिवार व व्याहळी कॉलनी ग्रामस्थांच्या वतीने भव्य मोफत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी हा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत असून, यंदाचे हे सातवे वर्ष आहे.कै. अजय थोरवे हे व्याहळी कॉलनी गावातील सर्वांच्या मनात घर करून राहिलेले, शांत, मनमिळावू व समाजकार्याची जाणीव असलेले तरुण होते. सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग असायचा. त्यांच्या स्मृती जिवंत ठेवण्यासाठी मोरया रे ग्रुप व मित्रपरिवाराने रक्तदान शिबिरासारखा स्तुत्य उपक्रम सुरू केला आणि तो सातत्याने यशस्वीरित्या राबवित आहेत. सदर रक्तदान शिबिर शुक्रवार दि. १३ जुलै २०२५ रोजी सकाळी ०८ ते सायंकाळी ०७ वाजेपर्यंत जि. प. प्राथमिक शाळा, व्याहळी कॉलनी, ता. वाई, जि. सातारा येथे आयोजित करण्यात आले आहे.



"रक्तदान हे जीवनदान आहे" हा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे आणि गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.गेल्या सहा वर्षांत या शिबिराला व्याहळी कॉलनी तसेच वाई तालुक्यातील पश्चिम भागातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. अनेक तरुणांनी नियमित रक्तदाता म्हणून पुढाकार घेत सामाजिक बांधिलकी जपली आहे. या उपक्रमामुळे परिसरात एकोप्याची भावना अधिक दृढ झाली आहे.यंदाही मोठ्या संख्येने रक्तदाते सहभागी होतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. प्रत्येक रक्तदात्यास प्रोत्साहनपर भेटवस्तू देण्यात येणार आहे.व्याहळी कॉलनी तसेच वाई तालुक्यातील पश्चिम भागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करून "रक्तदान हेच खरे श्रेष्ठदान आहे" हा संदेश कृतीतून सिद्ध करावा, असे आवाहन मोरया रे ग्रुप व मित्रपरिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.कै. अजय थोरवे यांच्या स्मृतींना मानवंदना देत, समाजहिताचा संदेश देणारा हा उपक्रम परिसरातील सामाजिक ऐक्य व सेवाभाव अधिक बळकट करीत आहे.

आरोग्य, विद्यूत, पाणी पुरवठा, जलसंधारणसह पायाभूत सुविधांसाठी वाढीव 346 कोटींची मागणी करणार - पालकमंत्री शंभूराज देसाई

सातारा दि.11–

जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत 2026-27 साठी मंजूर नियतव्यय 524 कोटी 56 लाखांचा असून आरोग्य, विद्यूत, पाणी पुरवठा, जलसंधारण यासारख्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी वाढीव 346 कोटी 46 लाखांची मागणी राज्यस्तरीय समितीकडे करण्याची शिफारस पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत घेण्यात आला.जिल्हा नियोजन समितीची बैठक नियोजन भवन येथे पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली झाली यावेळी आमदार शशिकांत



शिंदे, आमदार मनोज घोरपडे, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, जिल्हा नियोजन अधिकारी यशवंत थोरात, समाजकल्याण आयुक्त सुनिल जाधव, उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.या वर्षी सन 2025-26 मध्ये सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत 647 कोटी रुपयांचा निधी अर्थ संकल्पित आहे. यापैकी 31 जानेवारी 2026 अखेर एकूण 46.49 टक्के निधी यंत्रणांना वितरीत करण्यात आला आहे. मागणीप्रमाणे यंत्रणांना ताबडतोब निधी उपलब्ध करुन दिला जाईल. यंत्रणांनी त्यांच्याकडील झालेल्या कामाची देयके तातडीने निपटारीत करावीत, असे निर्देशही या बैठकीत देण्यात आलेत.या बैठकीत विभागांकडील विविध कामांचा व झालेल्या खर्चाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जलजीवन मिशनच्या ज्या कामांची चौकशी करण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल सादर करण्यात आलेला आहे. अशा प्रकरणांमध्ये चौकशीअंती काही गैर आढळून आले नसल्यास बंद ठेवण्यात आलेली कामे सुरु करण्याचे निर्देशही देण्यात आले. वन विभागाच्या हद्दीत असणाऱ्या अनेक रस्त्यांची कामे प्रलंबीत आहे .

कृषी उपसंचालकपदी निवड झालेल्या ओमकार पारटे यांचा वेलंग येथे सत्कार समारंभ

वाई प्रतिनिधी :

प्रशांत थोरवेवेलंग गावचे माजी विद्यार्थी ओमकार कालीदास पारटे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत यश संपादन करत कृषी उपसंचालक या प्रतिष्ठित पदावर निवड मिळवली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल गावात सर्वत्र अभिमान व आनंद व्यक्त होत असून, त्यांच्या सत्कारासाठी विशेष गुणगौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.उद्या शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ४



वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वेलंग (ता. वाई) येथे हा सत्कार सोहळा पार पडणार आहे. ग्रामस्थ मंडळ वेलंग, भैरवनाथ सेवा तरुण मंडळ वेलंग (मुंबई) तसेच माजी विद्यार्थी संघ वेलंग यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.ग्रामीण भागातून स्पर्धा परीक्षेत यश मिळवून राज्यस्तरावर मानाचे स्थान मिळवणे ही गावासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. ओमकार पारटे यांच्या मेहनती, चिकाटी व जिद्दीमुळे आज त्यांनी हे यश संपादन केले असून, त्यांचा प्रवास तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.या गुणगौरव समारंभास गावातील ग्रामस्थ, तरुण वर्ग, मंडळाचे कार्यकर्ते तसेच विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ओमकार पारटे यांना शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

गिरड ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांकडून मोहगांव येथील सरपंच विलास नवघरे यांच्या विकास कार्याचा गौरव

तालुका प्रतिनिधी (अमोल झाडे)

समुद्रपुर:

तालुक्यातील मोहगांव ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या मोहगांव,तावी ,रासा केसलापार वानरचुवा,या पाचही गावात ५ वर्षात भुतोना भविष्य असे विकास काम करणाऱ्या मोहगांव ग्रामपंचायतीचे सरपंच विलास नवघरे यांच्या जिल्हा उत्कृष्ट सरपंच म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या मोहगांव ग्रामपंचायतीचे सरपंच विलास नवघरे यांच्या कार्याचा गौरव कार्यक्रमाचे आयोजन गिरड ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आले होते. यावेळी सरपंच राजु नौकरकर, उपसरपंच मंगेश गिरडे,माजी पंचायत समिती सदस्य तथा ग्रामपंचायत सदस्य शेख ईस्राईल,अमोल पर्बत, राहुल गाढवे यांच्या उपस्थितीत सरपंच विलास नवघरे यांचा गौरव करण्यात आला.यावेळी सरपंच राजु नौकरकर म्हणाले की सरपंच विलास नवघरे यांनी संसाराचा गाढा व आपली पत्रकार तसेच



समाजात कार्य , सरपंच संघटनेची मोठी जबाबदारी सांभाळून मेहनत जिद्द चिकाटी व गावासाठी गावातल्या लोकांसाठी काही तरी करायच मनता ईच्छा बाळगून शासनाच्या विविध योजनेतून आमदार समिर कुणावार यांच्या माध्यमातून विकास निधी उपलब्ध करून त्यांनी ५ वर्षात भुतोना भविष्य असे विकास कामे केली आहे.तर माजी पंचायत समिती सदस्य शेख ईस्राईल म्हणाले की सरपंच विलास नवघरे यांनी त्यांच्या सोभावाने प्रत्येक अधिकारी कर्मचारी यांचे मने जिंकूनप्रत्येक विकास कामांचा मंजूर करण्यापासून तर पुर्ण होण्यापर्यंत पाठपुरावा करून काम करून त्याची योग्य पद्धतीने अमलबजावणी करून गावाचा मोठ्या प्रमाणात विकास केला आहे सोबतच अधिकाऱ्यांसोबत ताळमेळ जळून गावातील नागरीकांच्या सरकारी सह विविध समस्या तत्परतेने सोळविणे अशी तालुक्यातच नाही तर जिल्हा ओळख निर्माण केली आहे. उपसरपंच मंगेश गिरड ग्रामपंचायत सदस्य राहुल गाढवे यांनी सुध्दा मनोगत व्यक्त करुन सरपंच विलास नवघरे यांच्या पुढिल कारकीर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी राकेश बोबडे,ग्रामसेवक अखिल ढोबळे, संतोष पुरकाम, किशोर जाधव,मोहगांव येथील उपसरपंच सपनाताई बाभडे,ग्रामपंचायत सदस्य राजु परचाके, संदीप दातारकर, सुनिता वाघाडे, शिलाताई धारणे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष अनिल धोटे, माजी उपसरपंच वासुदेव मोघरे,गोविंदा बाभडे,मंगेश गारघाटे, अरूण ठाकरे, दौलत शाहरे, विलास राऊत, गोलू बांगरे,आदी प्रामुख्याने उपस्थितीत होते.

मोकाट कुत्र्याचा वासरावर हल्ला;

पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाचा आरोप

काटोल /प्रशांत पवार

नरखेड तालुक्यातील येरला (पावडे) येथील शेतकरी घनश्याम डफरे यांच्या एक महिन्याच्या गाईच्या वासरावर मोकाट कुत्र्याने मानेला चावा घेतल्याची घटना घडली. या हल्ल्यात वासरू गंभीर जखमी झाले आहे.जखमी वासराला तातडीने नरखेड येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र तेथे संबंधित अधिकाऱ्यांनी उपचार करण्यास नकार दिल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी वासराला पुढील उपचारासाठी काटोल येथील केंद्रातही डॉक्टर गैरहजर असल्याने



शेतकऱ्यांची मोठी तारांबळ उडाली. पीडित शेतकऱ्यांनी शेतकरी नेते सागर दुधाने यांना फोन करून संपूर्ण घटनेची माहिती दिली. दुधाने यांनी तातडीने काटोल येथील पशुवैद्यकीय केंद्राला भेट देत संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क साधला व शेतकऱ्यांची अडचण समजून घेण्याची विनंती केली. त्यानंतर वासराला येथील पशुवैद्यकीय केंद्रात आणले.दरम्यान, काटोल दुसऱ्या केंद्रातून पशुवैद्यकीय अधिकाऱ्याला बोलावून वासरावर प्राथमिक उपचार करण्यात आले व मलमपट्टी करून घरी पाठविण्यात आले.सध्या वासराची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. या संपूर्ण प्रकारामुळे पशुवैद्यकीय विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.अशा प्रकारे निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित डॉक्टरांवर प्रशासन कोणती कारवाई करणार, असा सवाल शेतकरी व नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

'गिताई' संस्थेतर्फे कुर्झडी (पोर्ट,)'ज्येष्ठ स्नेह प्रकल्प' उत्साहात संपन्न;

ज्येष्ठांचा सन्मान; अनोखा उपक्रम

आरती कारंजेकर देवळी (प्रतिनिधी):

ग्रामसेवा लोक अभियान अंतर्गत गिताई ग्रामीण विकास संस्था देवळी व वंचित विकास संस्था ,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कूर्झडी(पोर्ट)येथे ज्येष्ठ स्नेह प्रकलपाचे उद्घाटन करण्यात आले.समाजातील अनुभवी मार्गदर्शक असलेल्या ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य उत्तम राहावे आणि त्यांना मानसिक सुख-शांती लाभावी, या उद्देशाने ग्रामसेवालोक अभियान अंतर्गत गिताई बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्था, देवळी यांच्या वतीने 'ज्येष्ठ स्नेह प्रकल्प' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात देवळी व परिसरातील ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.उपस्थितांना मार्गदर्शन करताना गिताई बहुउद्दशीय ग्रामीण विकास संस्थेच्या अध्यक्षा आरती अशोक कारंजेकर म्हणाल्या की, "ज्येष्ठांचे आशीर्वाद हीच आमची खरी पुंजी आहे. गिताई संस्थेचा उद्देश केवळ सामाजिक कार्य करणे हा नसून, आपल्या वडिलधाऱ्या मंडळींना आपण समाजाचा एक अविभाज्य आणि महत्त्वाचा घटक आहोत, याची जाणीव करून देणे आहे.ही संस्था सदैव त्यांच्या पाठीशी



उभी राहील."संस्थेचे सचिव योगेश कांबळे यांनी यावेळी ज्येष्ठांसाठी असलेल्या विविध शासकीय योजना आणि त्यांच्या हक्कांची सविस्तर माहिती दिली. भविष्यातही ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणार्थ आणि आरोग्यासाठी संस्था सातत्याने असे नाविन्यपूर्ण प्रकल्प राबविणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले या प्रसंगी सहजीवन संस्थेतील योगेश ढोक व साईबाबा ग्रामीण विकास संस्था, चांदुर रेल्वेचे अध्यक्ष बंडू आंबटकर ,रंजिता तराले , यांनी जेष्ठाना मार्गदर्शन केले.ज्येष्ठ नागरिक स्नेह शिबिरात वृद्धांचे विविध समस्या व त्यांचे मानसिक, शारीरिक आरोग्या बद्दल कसे कार्य करायचे वृद्धांच्या आयुष्यातील पुढील जिवन सुखकर व आयुष्यातील प्रत्येक संध्याकाळ ही सुखकर होण्यासाठी विविध उपाय योजनाचे नियोजन करण्यात आले.यावेळेस प्रशिक्षणात पुढील होणाऱ्या कार्यक्रमाबाबत मांडणी केली. या शिबिरात मोठ्या संख्येने जेष्ठ नागरिक उपस्थित होते. उपस्थित असलेल्या वृद्ध माता-पित्यांच्या सहभागामुळे कार्यक्रमात एक कौटुंबिक आणि आत्मीय वातावरण निर्माण झाले होते.वाढत्या वयातील शारीरिक समस्या आणि जीवनशैली यावर तज्ज्ञांनी उपस्थितांशी संवाद साधला.आरोग्यविषयक जनजागृतीसाठी उपस्थित सर्व ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन पुस्तिकांचे वाटप करण्यात आले.या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी गिताई संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. उपस्थितांनी संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक करून हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरला असे मत जेष्ठांनी व्यक्त केले.

अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय कळमेश्वर ऐवजी काटोल येथे घेण्यात यावे- संजय डांगोरे

काटोल/प्रशांत पवार

माननीय महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यामधील अतिरिक्त ११ अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय तथा अतिरिक्त ६९ अप्पर तहसील कार्यालयाची निर्मिती होणार आहे .यामध्ये शासकीय कामाचा वाढता व्याप पाहता प्रशासनामध्ये सुटसुटीत पणा येण्यासाठी आणि जनतेचा त्रास वाचण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयाची निर्मिती बहुतेक जिल्ह्यामध्ये होणार असल्याचे कळते .शासनाच्या पत्रानुसार आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना माहिती मागवलेली असून यामध्ये नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय ची माहिती सुद्धा त्यांनी मागतलेली आहे. काटोल हा नवीन जिल्हा व्हावा ,येथे नवीन अतिरिक्त अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय व्हावं अशी मागणी जुनी असून सुद्धा शासनाने याकडे दुर्लक्ष करून कळमेश्वर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय करनार असल्याची माहिती मागविण्यात आलेली आहे. यामुळे जनतेमध्ये असंतोष असून सर्व तालुक्यांना परवडेल आणि सर्व सोयीने पुर्ण असा मध्यवर्ती काटोल कार्यालय असून सुद्धा त्याकडे सरकारने दुर्लक्ष का केले ? असा प्रश्न काटोल जिल्हा कृती समितीचे अध्यक्ष तथा माजी पं. स. सभापती संजय डांगोरे यांनी केलेला आहे .काटोल च्या परिसरामध्ये नरखेड, हिंगणा ,कळमेश्वर, सावनेर या तालुक्याचा भाग लगतच येत असून सुद्धा काटोलला का डावलण्यात आले? महसूल मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी काटोल येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय तथा कोंढाळी आणि जलालखेडा येथे अप्पर तहसील कार्यालय करण्यासाठी बोलले होते.कोंढाळी आणि जलालखेडा येथे अप्पर तहसील कार्यालय होण्यासाठी माहिती मागविण्यात आली असली ,तरी अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय काटोल ची माहिती मागविण्यात आली नसल्याने याची जनतेमध्ये फारच खमंग चर्चा सुरू आहे. या भागातील आमदार श्री चरणसिंग ठाकुर तथा इतर सर्व जनप्रतिनिधीची मागणी असून सुद्धा शासनाने कळमेश्वरच का निवडले ? तेव्हा शासनाने काटोल येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाची निर्मिती काटोल येथेच करावी अशी मागणी जनतेचमध्ये जोर धरत आहे.

ओम अरनेश अपार्टमेंट चे 3 वर्षांपासून प्रलंबित लेखापरीक्षण व निवडणूक घेण्याची निबंधक कार्यालया कडे मागणी

नागपुर :- कोराडी नाका येथील स्नेह नगर जवळील ओम अरनेश सोसायटी येथील 43 फ्लॅटधारक सोसायटी चे लेखा परीक्षण 3 वर्षांपासून प्रलंबित असून या करिता प्रशासन उदासीन दिसत आहे.सोसायटी मधील सर्व फ्लॅट धारकांनी याबद्दल निबंधक कार्यालय शहर - 1 या कार्यालय मध्ये चौकशी केली असता असे निदर्शनास आले की, सोसायटी च्या कोषाध्यक्ष यांनी आजपावेतो संबंधित दस्ता ऐवज देण्यास टाळाटाळ करत असल्यामुळे लेखा परीक्षण करण्यासाठी दिरंगाई होतं आहे, निबंधक कार्यलया द्वारे अनेकदा यासंदर्भात विचारणा केली असता सोसायटी च्या कोषाध्यक्षा कडून टाळाटाळ करण्यात येत आहे, सोसायटी चे संबंधित एकही दास्ताऐवज निबंधक कार्यालयात जमा न केल्यामुळे सोसायटी चे लेखापारीक्षण रखडलेले आहे व लेखापरीक्षण न झाल्यामुळे सोसायटी ची निवडणूक रखडलेली आहे.लेखापारीक्षण करिता लागणारे दस्ता ऐवज जसे की, आय रजिस्टर, जे रजिस्टर, कॅश बुक, बँकेचे सर्व व्यवहार, नोंदणी रजिस्टर, सभेचे इतिवृत्त, मासिक सभेचे रेकॉर्ड, शेअर सर्टिफिकेट इत्यादी कुठलेही रेकॉर्ड अद्यावत नसून याबाबत सोसायटचे सर्व फ्लॅटधारक चिंतेत आहेत.याकरिता सोसायटी च्या सर्व फ्लॅट धारकांच्या वतीने उपनिबंधक यांस सोसायटी च्या बेकायदेशीर कारभाराला आळा घालण्यासाठी प्रशासक नियुक्ती करून तात्काळ लेखापरीक्षण करून सोसायटी नियमित करण्याकरिता निवेदन देण्यात आले.व तसेच संपूर्ण प्रकरणात सखोल चौकशी करून दोषी व्यक्तीवर कायदेशीर कार्यवाही करण्याची विनंती निवेदनात करण्यात आली.त्यानुसार शासकीय तपास यंत्रणेकरिता आलेल्या अधिकाऱ्यांवर चुकीचे आरोप लावून व पंच म्हणून ज्यांची नियुक्ती केली त्यांना फ्रॉड म्हटल्या गेले असे सोसायटी च्या ग्रुप मध्ये टाकून 43 फ्लॅट धारकांचा गैरसमज करण्यात आलेला आहे.

पाबळ ते पुणे(मनपा भवन) नवीन विस्तारित बस सेवा सुरु

लोणी प्रतिनिधी (कैलास गायकवाड)

पाबळ ता. शिरूर आज गुरुवार दिनांक 12/02/2026 पासून नवीन विस्तारित बस सेवा चालू झाली आहे. त्याविषयी वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.बस क्रमांक - 162 म. न. पा.(भवन) ते पाबळगांव. (मार्ग - पुणे स्टेशन - वाघोली -कोरेगाव भीमा- केंदूरगाव -मार्गे-पाबळ)याचे वेळापत्रक पुढील प्रमाणे (1)- सकाळी 6.00वा. पाबळगांव ते म. न. पा. भवन (मार्गे -केंदूरगाव



-वढू बुद्रुक -कोरेगाव भीमा- वाघोली-पुणे स्टेशन)(2)सकाळी 9.15.वा.म. न. पा. भवन ते पाबळगाव (मार्ग वाघोली -कोरेगाव भीमा -वढू बुद्रुक - केंदूरगाव)(3) सकाळी -11.45वा. पाबळगाव ते म. न. पा. भवन (मार्ग केंदूरगाव - वढू बुद्रुक -कोरेगाव भीमा -वाघोली -पुणे स्टेशन -म. न. पा. भवन)(4) दुपारी 2.30 म. न. पा. ते पाबळगाव (मार्ग वाघोली - कोरेगाव भीमा -वढू बुद्रुक - केंदूरगाव)(5)सायं.5.00वा. पाबळगांव ते म. न. पा. भवन (मार्ग -केंदूरगाव --वढू बुद्रुक - कोरेगाव भीमा -वाघोली -पुणे स्टेशन)(6) रात्री 8.15 वा.म. न. पा. भवन ते पाबळगाव (शेवटी मुक्कामी बस) (मार्ग -पुणे स्टेशन -वाघोली -कोरेगाव भीमा -वढू बुद्रुक -केंदूरगाव) तरी समस्त ग्रामस्थ, भाविक, यात्रीकरू, विध्यार्थी वर्ग कर्मचारी वृंद, यांनी याचा फायदा करून घ्यावा अशी पी. एम. पी एल. प्रशासनकडून विनंती करीत आहे.

भारतीय भाषांचे शाब्दिक साम्य समजून घेण्याची आवश्यकता - प्रो. सर्राजू

विद्यापीठाच्या हिंदी विभागातील राष्ट्रीय कार्यशाळेचा समारोप

नागपूर : (दिलीप येवले) भारतीय भाषांच्या शब्दावलीतील साम्य समजून घेण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन भारतीय भाषा समिती शिक्षण मंत्रालय नवी दिल्लीचे सल्लागार प्रो. सर्राजू यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पदव्युत्तर हिंदी विभाग आणि भारतीय भाषा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने भाषा भवन येथे दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा पार पडली. कार्यशाळेच्या बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेल्या समारोपीय कार्यक्रमात प्रो. सर्राजू मार्गदर्शन करीत होते.माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून भारतीय भाषा समिती शिक्षण मंत्रालय नवी दिल्लीचे सल्लागार प्रो. सर्राजू, डॉ. वंदना खुशलानी, श्री. अजय पाठक यांची उपस्थिती होती. भारतीय भाषांचे स्वरूप बऱ्याच प्रमाणात सारखे आहे. भाषांमध्ये अर्थविषयक बरेच साम्य असून वापरात काही प्रमाणात फरक असला तरी, प्रादेशिक ओळख लक्षात घेता भाषेच्या शब्दावलीतील साम्य समजून घेण्याची आवश्यकता प्रो. सर्राजू यांनी पुढे बोलताना व्यक्त केली. भारतीय भाषांचा परस्परसंबंध समजून घेण्यासाठी, भाषांमधील समानता समजून घेतली पाहिजे. आपल्या भाषांमध्ये विविधता असूनही, त्यांच्यात बरीच समानता आहे. आपला देश सांस्कृतिकदृष्ट्या एकसंघ असून भाषा केवळ संवादाचे साधन राहिलेल्या नाहीत तर राष्ट्राला एकत्र आणण्याचे साधन देखील बनले आहेत. सर्व भाषांमध्ये समान शब्दांचे संकलन आणि निर्मिती करण्याची गरज प्रो. सर्राजू यांनी अधोरेखित केली. प्रमुख अतिथी डॉ. वंदना खुशलानी यांनी आपल्या भाषणात हिंदी आणि मराठीच्या समान स्वरूपावर चर्चा करीत भाषा हे सामाजिक संबंधाचे माध्यम असल्याचे सांगितले. या माध्यमातून समाजातील विविध कामे साध्य होत मानवी नातेसंबंध अधिक दृढ होत असल्याचे सांगितले. विशेष अतिथी म्हणून बोलताना श्री.अजय पाठक यांनी समान शब्दांचा वापर होईल तेव्हाच भारतीय भाषांमध्ये समन्वय वाढेल, असे सांगितले. चर्चासत्राचा अहवाल सादर करताना निमंत्रक डॉ. मनोज पांडे म्हणाले की, भारतीय भाषांमधील समान शब्द हे राष्ट्रीय एकात्मतेचा आधार आहेत. शब्द हे राष्ट्र आणि समाजाला जोडण्याचे माध्यम आहेत. भाषा जपल्या गेल्या तर जीवन अधिक सुरक्षित होईल नातेसंबंध मजबूत होत बंधुता वाढेल, असे डॉ. पांडे म्हणाले.यावेळी भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने राष्ट्रनिर्माता सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त प्रकाशित झालेल्या पुस्तकाचे प्रकाशन प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तकाचे संपादन डॉ. मनोज पांडे यांनी केले आहे. दोन दिवसांच्या राष्ट्रीय कार्यशाळेत हिंदी आणि मराठी भाषेतील सामान्य शब्द संग्रहावर उत्साहवर्धक आणि उपयुक्त चर्चा झाली. यावेळी आयोजित काव्य चर्चासत्रात डॉ. लोकेंद्र सिंह, अविनाश बागडे, अनिल मालोकर, नीरज श्रीवास्तव, वेस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेडचे महासंचालक नरेंद्र कुमार, सत्येंद्र प्रसाद सिंह, शशिकांत शर्मा यांच्यासह अन्य कवींनी कविता सादर केल्या. कार्यशाळेला डॉ. प्रकाश कोपार्डे, हैदराबाद, डॉ. दिनेश पाठक, मुंबई, डॉ. संदीप सपकाल, वर्धा, डॉ. विजय कलमधार, छिंदवाडा, डॉ. सुनील व्यवहारे, किनवट, डॉ. राहुल म्हैसकर, पुणे, डॉ. भूषण भावे, गोवा, डॉ. महेंद्र ठाकुरदास, पुणे, डॉ. सपना तिवारी, डॉ. अमृता इंदुरकर, डॉ. विनय कुमार उपाध्याय, डॉ. कल्याणी काळे यांच्यासह हिन्दी, मराठी आणि संस्कृतचे ४० विषय तज्ञ उपस्थित होते.

सनशाईन स्कूल, कारंजा येथे "बजेट 2026" विषयावर शुभम जयस्वाल यांची मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात संपन्न

कारंजा (सिद्धार्थ सोमकुवर) सनशाईन स्कूल, कारंजा येथे दिनांक 12 फेब्रुवारी 2026 रोजी "केंद्रीय अर्थसंकल्प 2026" या विषयावर विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे संस्थाध्यक्ष तथा मुख्याध्यापक प्रेम महिले यांच्या संकल्पनेतून आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून अर्थविषयक अभ्यासक व प्रेरणादायी वक्ते कारंजा येथील सनदी लेखापाल शुभमजी जयस्वाल उपस्थित होते.प्रेम महिले यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्यार्थ्यांना अर्थसंकल्पाची मूलभूत संकल्पना समजून घेणे किती आवश्यक आहे, यावर प्रकाश टाकला व शुभम जयस्वाल यांनी आपल्या सविस्तर मार्गदर्शनात बजेट 2026 मधील प्रमुख मुद्दे विद्यार्थ्यांना सोप्या व



समजण्यासारख्या भाषेत स्पष्ट केले. त्यांनी कररचना, शिक्षण व आरोग्य क्षेत्रासाठीची तरतूद, पायाभूत सुविधांवरील खर्च, डिजिटल व स्टार्टअप क्षेत्रातील संधी तसेच ग्रामीण विकासासाठीच्या योजनांचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांना त्यांनी "बजेट म्हणजे फक्त आकडेवारी नसून देशाच्या विकासाचा आराखडा आहे" असे सांगत अर्थसंकल्पाचा दैनंदिन जीवनाशी असलेला संबंध स्पष्ट केला.कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपली उत्सुकता व्यक्त केली. प्रश्नोत्तर सत्रात जयस्वाल यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधानकारक निरसन केले. त्यामुळे कार्यक्रम अधिक संवादात्मक व ज्ञानवर्धक ठरला.कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या विद्यार्थिनीने आभार प्रदर्शन केले. उपस्थित शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेबद्दल समाधान व्यक्त केले. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय घडामोडींबाबत जागरूकता निर्माण होऊन त्यांची विचारशक्ती व विश्लेषण क्षमता विकसित होण्यास मदत होते, असा विश्वास शाळा प्रशासनाने व्यक्त केला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सनशाईन स्कूल, कारंजा परिवाराचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

बार्टी मार्फत आमदार राजेभाऊ बकाने यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा भेट

देवळी
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांच्यावतीने महासंचालक सुनील वारे, निबंधक तथा समाज कल्याण सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे, विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड तसेच समतादूत प्रकल्प व्यवस्थापक डॉ. सुमेध थोरात यांच्यामार्फत क्रांतीभूमी महाड जि. रायगड येथे झालेल्या दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेत देण्यात आलेल्या निर्देशानुसार राज्यातील सर्व आमदार यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा भेट स्वरूपात देण्याचा उपक्रम नाविन्यपूर्ण



उपक्रम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने जिल्हा वर्धा येथील देवळी पुलगाव मतदार संघाचे विद्यमान आमदार राजेभाऊ बकाने यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा व भारतीय संविधान प्रत भेट स्वरूपात देण्यात आली. त्याचप्रमाणे बार्टी प्रकल्पाची माहिती पत्रिका देऊन प्रकल्पा संदर्भात माहिती सांगण्यात आली हा कार्यक्रम बार्टीचे महासंचालक माननीय सुनील वारे ,निबंधक तथा सहायक आयुक्त विशाल लोंढे आणि विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडला यावेळी वर्धा जिल्हा बार्टी प्रकल्प अधिकारी दिनेश बाराई यांच्या सह समतादुत रूपाली ठाकरे तालुका देवळी, समतादुत स्वप्नील चवरे समतादूत विक्की बिजवार तसेच सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश भोयर, देवळी नगरपरिषद उपाध्यक्ष राहुल चोपडा , सामाजिक कार्यकर्ते संजय बिजवार व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

जागतिक पातळी वर कॅन्सर चे रुग्ण वाढतायेत ही बाब चिंताजनक!

कॅन्सर रोग तज्ञ डॉ मुकुल घरोटे

27 फरवरी ला हरिओम गौशाला लसनपूर येथे कॅन्सर रोग निदान शिबीर

तालुका प्रतिनिधी (अमोल झाडे)
समुद्रपूर जगामध्ये कुठल्याही रोगापेक्षा कॅन्सरचे रुग्ण दिवसेंदिवस वाढतायत ही बाब चिंताजनक आहे. कॅन्सरचे प्रमाण अधिक आहे इंडीयन कौन्सिल मेडीकल रिसर्च (आय सी एम आर) च्या अंदाजानुसार भारतामध्ये सुमारे २०लाख लोक नवीन कॅन्सरचे रुग्ण आहेत, सरासरी १० लाख मृत्यू कॅन्सर मुळे होऊ शकतात . जागतिक अर्थकारणाचा अहवालानुसार जागतिक अर्थव्यवस्थेतील तीन सर्वात मोठ्या धोक्यापैकी एक आहे तंबाखूजन्य पदार्थ व तंबाखू हि त्या मागची कारणे आहेत . तंबाखू मध्ये एक दोन नव्हे तर तब्बल १०० कॅन्सर करणारे द्रव्य सापडले आहेत. कॅन्सर विरुद्ध लढाईसाठी आता व्यसनापासून दूर राहण्याची गरज असल्याचे मत कॅन्सर रोग तज्ञ डॉक्टर मुकुंल घरोटे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले . त्याच अनुषंगाने हरिओम बाबा गौशाला लसनपूर व डॉ मुकुल घरोटे याचे संयुक्त विद्यमाने 27 फरवरी ला लसनपूर येथे कॅन्सर रोग निदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे डॉक्टर घरोटे म्हणाले की कॅन्सर संदर्भात आता नागरिकांमध्ये



मोठ्या प्रमाणावर जनप्रबोधन होण्याची गरज निर्माण झाली आहे आजाराबाबत जागृती करण्यासाठी सामाजिक सेवाभावी संघटना व कार्यकर्त्यांनी पुढे येण्याची मोठी गरज आहे . भारतात प्रत्येक वर्षी दहा लाख लोक नवीन कॅन्सरग्रस्त लोकांत कॅन्सर चे निदान होत आहे .त्यात बालकांचा देखील समावेश आहे त्याबरोबर त्यात तरुणांची संख्या देखील मोठी आहे जर या आजारावर मात करायची असेल तर व्यसनापासून दूर राहण्याची काळाची गरज आहे. हा आजार वाढणार नाही यासाठी प्रतिबंधात्मक उपाय माहितीचा प्रचार आणि प्रसार होणे महत्त्वाची बाब ठरत आहे .कॅन्सर ग्रस्त रुग्णांचे मनोबल वाढवणे योग्य उपचार व मार्गदर्शन तसेच कुटुंबातील सदस्यांची सकारात्मक बघण्याचा दृष्टिकोन ही बाब देखील महत्त्वाची आहे वैद्यकीय क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान यामुळे आजाराला योग्य प्रकारे प्रतिबंध करता येऊ शकतो .कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यू पैकी ७० टक्के मृत्यू विकसनशील भारतासारख्या देशांमध्ये होत आहे .कॅन्सररोग निदान चाचण्या आवश्यक !कॅन्सर हा सैतान दबक्या पावलांनी येतो ही शोकांतिका आहे, म्हणून त्रास होण्याची वाट न बघता योग्य वेळी चाचणी केल्यास हा आजार पहिल्या टप्प्यात निदान होऊन पूर्णपणे बरा होऊ शकतो.कॅन्सरग्रस्त रुग्ण सामाजिक परिस्थिती भिती लाजेपोटी आर्थिक परिस्थिती अशा कारणामुळे निदान करत नाही व उपचार घेत नाही ,त्यामुळे देखील काही जण आपला जीव गमावतात. अनेक रुग्ण तिसऱ्या किंवा चौथ्या स्टेजमध्ये उपचारासाठी दाखल होतात अशावेळी डॉक्टरांना देखील उपचार करणे अवघड होते. स्त्रीया मध्ये स्तनाचा व गर्भाशयाचा तर पुरुषांमध्ये मुखरोग व फुप्फुसाचा कर्करोग हे कॅन्सर प्रामुख्याने दिसून येतात.हे सर्व आजार लवकर निदान केल्यास पूर्णपणे बरा होतो असे प्रतिपादन डॉ मुकुल घरोटे यांनी केले आहे. जागतिक कर्करोग (कॅन्सर) महिला विशेष शिबीर आयोजित करण्यात आले आहेडॉ. मुकुल घरोटे यांचे मुक्ता कॅन्सर सेंटर, नाशिकसंलग्न: मुक्ता कॅन्सर क्लिनिक व परमपूज्य हरी ॐ बाबा गोशाळा ट्रस्टयांच्या संयुक्त विद्यमाने२७ फेब्रुवारी २०२६वेळ: सकाळी ९:०० ते दुपारी ५:००भव्य मोफत 'ब्रेस्ट कॅन्सर' तपासणी शिबिर (AI Technology आधारित – विनास्पर्श तपासणी) कोणताही रेडिएशन धोका नाही पूर्णतः सुरक्षित व गोपनीय आहे स्थळ: हरी ॐ बाबा गोशाळा ट्रस्ट , , लसणपूर तेव्हा यांचा लाभ घेण्याचे आव्हान ट्रस्टी घनश्यामबाबू पुरोहित यांनी केले आहे

आष्टी तालुक्यातील दोन दुर्दैवी घटना; पीडित कुटुंबांना त्वरित शासकीय मदत द्या

- भाजपा युवा मोर्चाचे तहसीलदारांना निवेदन

तळेगाव प्रतिनिधी (राजेंद्र खंडारे) आष्टी:
तालुक्यातील मौजे वडाळा आणि मौजे नरसिंगपूर येथे घडलेल्या दोन वेगवेगळ्या दुर्दैवी घटनांनी परिसर हादरला आहे. या दोन्ही घटनेतील पीडित कुटुंबांवर ओढावलेले संकट पाहता, त्यांना शासनाकडून तात्काळ आर्थिक मदत मिळावी, या मागणीचे निवेदन आज भारतीय जनता युवा मोर्चा आणि किसान मोर्चाच्या शिष्टमंडळाने आष्टी तहसीलदारांना दिले.दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी नरसिंगपूर येथील रहिवासी श्री. दिलीप वाघाळे यांचा कालव्यात वाहून गेल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, एक लहान मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. घरातील





कर्ता पुरुष गेल्यामुळे हे कुटुंब उघड्यावर पडले असून, मुलांच्या भविष्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या कुटुंबाला आधार देण्यासाठी शासनाने तातडीने आर्थिक मदत करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.तसेच, दुसरी घटना मौजे वडाळा येथे घडली. युवा मोर्चाचे सहकारी सागर भिवापूरे यांच्या राहत्या घरी दिनांक ११ फेब्रुवारी रोजी गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट झाला. सुदैवाने यात जीवितहानी झाली नाही, परंतु त्यांचे राहते घर पूर्णपणे उध्वस्त झाले असून संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच आष्टीचे आमदार श्री. सुमितदाद वानखेडे यांनी स्वतः फोन करून कार्यकर्त्याला धीर दिला व पक्ष पाठीशी आहेअसा विश्वास दिला.या दोन्ही घटनांचे गांभीर्य लक्षात घेऊन, प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून मुख्यमंत्री सहायता निधीतून किंवा आपत्ती निवारण निधीतून दोन्ही कुटुंबांना जास्तीत जास्त आर्थिक मदत द्यावी, जेणेकरून त्यांना पुन्हा उभे राहता येईल, अशी आग्रही मागणी भाजपा युवा मोर्चाने केली आहे.हे निवेदन देताना भाजपा युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अनिरुद्ध दंडाळे, किसान मोर्चा तालुकाध्यक्ष पंकज दुधकवरे, भाजपा युवा मोर्चा जिल्हा महामंत्री अक्षय राजूरकर, तालुकाध्यक्ष स्वराज वाघ, तालुका महामंत्री आशिष खोपे, धीरज भिवापूरे तसेच साहिल ठाकरे (जिल्हा उपाध्यक्ष) आकाश भगत, अनिकेत पोटे व इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे होणार वेगाने परिवर्तनमुख्यमंत्री - देवेंद्र फडणवीस

टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबतच्या करारांमुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास महाराष्ट्रभर पोहोचविणार

टाटा ट्रस्ट सोबत १२ व नाम फाउंडेशन सोबत एक सामंजस्य करार

मुंबई, (दिलीप येवले) : महाराष्ट्र विविध क्षेत्रांसह देशाच्या प्रगतीमध्ये वेगळा ठसा उमटवीत आहे. राज्याच्या प्रगतीचा वेग असाच कायम ठेवून राज्य शासनाच्या विविध स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे वेगाने परिवर्तन होईल,असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबत करण्यात आलेल्या करारावेळी व्यक्त केला. टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबत झालेल्या करारामळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास संपूर्ण महाराष्ट्रभर पोहचविणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.याप्रसंगी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर - साकोरे उपस्थित होत्या.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक कुटुंबासाठी आरोग्य, पोषण, पाणी सुरक्षा आणि उपजीविका सुधारणे याला शासनाचे प्राधान्य आहे. या भागीदारींमुळे विविध कल्याणकारी शासकीय योजना अधिक लोकोपयोगी होण्यास मदत होणार आहे. शासनाच्या योजना लोक चळवळीच्या स्वरूपात पुढे येत आहे. टाटा ट्रस्टचे सहकार्याने विविध विभागांच्या माध्यमातून सकारात्मक प्रभाव पाडण्यात यशस्वी होऊ. समाजातील सर्व घटकात उत्पन्न वाढून जगण्याचा स्तर उंचावण्यास यामुळे निश्चितच मदत होईल. दुर्धर आजारांवर महागड्या उपचार पद्धतीमुळे सामान्य नागरिकांना मर्यादा येतात मात्र राज्यात यापुढे उपचाराविना कुणीही मृत्यू पावणार नाही, अशी परिस्थिती निर्माण करण्यात येत आहे. टाटांची मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये मोठी मदत असून यामुळे आपण गरजू रुग्णांना निश्चित स्वरूपाची मदत देऊ शकतो.मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, मागील दहा वर्षापासून टाटा ट्रस्ट सोबत शासन काम करीत आहे. केवळ निधी देऊन भागीदारी होत नाही, तर काम करून समाजात सकारात्मक प्रभाव पाडणारी भागीदारी टाटा करत असते. हे बहु-आयामी करार माता, नवजात बालक, बाल आणि किशोरवयीन घटकांसाठी आरोग्य सेवा बळकट करणे, खुंटलेली वाढ रोखून कुपोषणावर उपाय शोधण्यासाठी मदतगार ठरतील. या सोबतच पोषणासाठी आहारात वैविध्य आणणे, जलस्रोतांचे अधिक शाश्वतपणे जतन आणि व्यवस्थापन, ग्रामीण महाराष्ट्रात हवामान आधारित कृषी आणि पशुधन विकासाला चालना देण्याची क्षमता या भागीदारीत आहे.नाम फाउंडेशन राज्यात जलसंधारणामध्ये मोठे काम करीत आहे. मागील काळात जल स्त्रोतांमधील गाळ काढणे , नाला,नदी खोलीकरण व रुंदीकरण आदी कामे करण्यात आली आहेत. राज्यात जलयुक्त शिवार योजना यशस्वीपणे राबविण्यात आली. ही योजना लोक चळवळीच्या स्वरूपात पुढे येत जनतेची योजना झाली. नाम फाउंडेशनच्या सहभागाने विदर्भ व मराठवाड्यातील कमी पर्जन्यमान असलेल्या भागात जलसंधारणाचे मोठे काम झाले. यासाठी टाटा ट्रस्टचीही मदत झाली असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.टाटा ट्रस्ट चे अध्यक्ष नोएल टाटा म्हणाले, महाराष्ट्र शासनाशी भागीदारी करून आरोग्य, शिक्षण, पोषण, उपजीविका, पाणी आणि स्वच्छता कार्यक्रमांमध्ये सुसूत्रता आणणार आहे. सर्व सामन्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न राहणार आहे. शासनाचे विविध विभाग आणि समुदायांसोबत सकारात्मक परिणाम आणण्याचा हेतू असणार आहे. शासन आणि टाटा ट्रस्ट्स यांनी आज राज्याच्या एकात्मिक विकासाला पाठबळ देण्यासाठी सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करून धोरणात्मक भागीदारी अधिकृत केली आहे. नाम फाउंडेशनचे नाना पाटेकर यांनीही शासनासोबत जलसंधारण क्षेत्रात काम करण्यास मदत मिळत असल्याबाबत समाधान व्यक्त केले.बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सचिव (आरोग्य) डॉ. निपुण विनायक, सचिव (महिला व बालविकास) अनुपकुमार यादव, टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा, नाम फाउंडेशनचे संस्थापक नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे, टाटा ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धार्थ शर्मा आदींसह टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन च पदाधिकारी उपस्थित होते.

कराराचा उद्देश

सामंजस्य करार तंत्रज्ञान, डिजिटल नवोपक्रम आणि 'लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी' याद्वारे आरोग्य, पोषण, जलसंधारण आणि ग्रामीण उपजीविका यांमधील शासकीय प्राधान्यक्रमांना पाठबळ देणे, समुदायांपर्यंत प्रमुख कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, नागपूर येथील सहा मान्यताप्राप्त रुग्णालयांसोबत केलेल्या करारांद्वारे, गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य देणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत दुर्धर गंभीर आजारांमध्ये सुलभ व कमी खर्चाचे उपचार उपलब्ध करून देणे आहे.

सामंजस्य करारांची व्याप्ती

माता, नवजात बालक, बालक आणि किशोरवयीन मुलांसाठी आरोग्य सेवा बळकट करणे; टेलिमेडिसिनसह इतर माध्यमांतून उपचार सहज देणे, शहरी आणि दुर्गम भागातील सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा वाढवणे, एकात्मिक आपत्कालीन व्यवस्थापन सेवाद्वारे उत्तम आपत्कालीन प्रतिसादास पाठबळ देणे. दोन वर्षांखालील मुलांमधील खुंटलेली वाढ, कमी वजन आणि कुपोषण रोखण्यास मदत करणे, किशोरवयीन कुपोषण आणि रक्तक्षय दूर करणे, गडचिरोली सारख्या जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित करून 'टेक-होम रेशन' सारख्या योजनांचे वितरण मजबूत करणे, तलावांचे पुनरुज्जीवन, जलकुंभ आणि नद्यांमधील गाळ काढणे, भूजल पुनर्भरण सुधारणे, मराठवाडा आणि विदर्भासह पाणीटंचाईग्रस्त भागांवर विशेष भर देऊन मृद व जलसंधारण योजनांची अंमलबजावणी करणे, हवामान बदलांचा अभ्यास करून शेतीला प्रोत्साहन देणे, वन-आधारित आणि ग्रामीण बिगर-शेती उपजीविकेला पाठबळ देणे, आरोग्य, शिक्षण, पोषण, पाणी, स्वच्छता आणि उपजीविका या सर्वांना एकत्र आणणारा एकात्मिक ग्राम विकास साधणे.

असे आहेत करार

टाटा ट्रस्टच्या सोबत शासनाने एकूण १२ करार केलेले आहेत. यामध्ये ग्रामविकास, जलसंधारण, सार्वजनिक आरोग्य, महिला व बालविकास, गडचिरोली जिल्हा प्रशासन, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, नागपूर येथील राष्ट्रीय कर्करोग संस्था, अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, मध्य भारत आयुर्विज्ञान संस्था, केअर हॉस्पिटल, स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन, मिदास मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल सोबत सामंजस्य करारांचा समावेश आहे. तसेच नाम फाउंडेशनचा जलसंधारण विभागासोबत करार करण्यात आला आहे.

महापौरांनी घेतला अधिकाऱ्यांकडून विकास प्रकल्पांचा विभाग निहाय आढावा

नागपूर, (दिलीप येवले): मा. महापौर श्रीमती निता ठाकरे यांनी आज (ता. ११) मनपा मुख्यालयातील आयुक्त सभाकक्षात मनपाच्या सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेऊन शहरात सुरू असलेल्या विविध विकास प्रकल्पांची सद्यस्थिती तसेच प्रस्तावित विकास प्रकल्पांचा विभाग निहाय आढावा घेतला. तीन तास चाललेल्या बैठकीत शहरातील उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे तसेच नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहावे, सर्व बाजारपेठामध्ये रात्री स्वच्छता करणे, दुषित पाण्याच्या समस्यांवर उपाययोजना व पादचाऱ्यांसाठी फुटपाथ अतिक्रमण मुक्त करण्यासाठी कडक पाऊले उचलण्याचे निर्देश महापौरांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले.यावेळी उपमहापौर श्रीमती



लिला हाथीबेड, सत्तापक्षनेता श्री. नरेंद्र (बाल्या) बोरकर, अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी. यांच्यासह मुख्य अभियंता श्री. मनोज तालेवार, मुख्य वित्त व लेखा अधिकारी श्री. सदाशिव शेळके, उपायुक्त तथा निगम सचिव डॉ. रंजना लाडे, उपायुक्त श्री. निर्भय जैन, उपायुक्त श्री. मंगेश खवले, उपायुक्त श्री. गणेश राठोड, उपायुक्त श्री. अशोक गराटे, उपायुक्त श्री. मिलिंद मेश्राम, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, उपायुक्त श्री. राजेश भगत, नगररचना विभागाचे उपसंचालक श्री. गिरीश गोडबोले, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, अधीक्षक अभियंता श्रीमती लिना उपाध्ये यांच्या सह सर्व झोनचे सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता व इतर अधिकारी उपस्थित होते.शहरात नागपूर महानगरपालिका तसेच राज्य सरकारच्या निधीतून प्रगतीपथावर असलेल्या विकास प्रकल्पांची माहिती संबंधित विभाग प्रमुखांकडून महापौर श्रीमती निता ठाकरे यांनी घेतली. नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शहरातील मालमत्ता कर तसेच इतर माध्यमातून मनपाचे उत्पन्न वाढविण्यासाठी विविध उपाययोजना सुचविण्याचे निर्देश दिले. शहरातील नागरिकांना उत्तम नागरी सुविधा उपलब्ध करून देणे, मनपाच्या उद्यानांमध्ये सोयीसुविधा उपलब्ध करून देणे, तसेच घनकचरा व्यवस्थापन योग्यरितीने करून शहराच्या सौंदर्यीकरणात भर घालण्यासाठी विविध सूचनाही यावेळी करण्यात आल्या. शहरात रेन हार्वेस्टिंगचा अधिकाधिक नागरिकांनी वापर करावा, यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावे तसेच नियमांमध्ये तशी सक्त तरतूद कराव्या, असेही यावेळी सुचविण्यात आले.

शेतकऱ्यांची वहिवाट होणार सुखकर!

आमदार सुमित वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली 'पाणंद रस्ते समिती' गठीत

आर्वी, आष्टी आणि कारंजा तालुक्यातील शेतकऱ्यांचा अनेक वर्षांपासूनचा प्रलंबित असलेला शेत शिवारातील रस्त्यांचा प्रश्न आता मार्गी लागणार आहे. 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजने' अंतर्गत वर्धा जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी आर्वी विधानसभा मतदारसंघ स्तरीय समिती जाहीर केली असून, या समितीच्या अध्यक्षपदी आमदार सुमित वानखेडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतात जाण्या-येण्याचा मार्ग आता खऱ्या अर्थाने मोकळा होणार आहे.आमदार सुमित वानखेडे यांची भूमिका नेहमीच शेतकरी हिताची राहिलेली आहे. शेतकऱ्यांना सिंचन सुविधा, दर्जेदार बियाणे पुरवठा आणि खतांच्या उपलब्धता याकडे आमदार सुमित वानखेडे यांनी यशस्वी प्रयत्न केले आहे.



त्यामुळे आर्वी विधानसभा क्षेत्रात नवनवीन सिंचन प्रकल्प साकारत आहेत. आता त्यांचे लक्ष शेतकऱ्यांची मुख्य समस्या 'वहिवाट' याकडे आहे. पावसाळ्यात आणि पीक काढणीच्या वेळी रस्त्यांअभावी शेतमाल वाहून नेणे जिकिरीचे ठरते. हीच अडचण ओळखून महायुती सरकारने 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना' अधिक प्रभावीपणे राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या समितीच्या माध्यमातून आता प्रशासकीय यंत्रणा आणि लोकप्रतिनिधी थेट समन्वयाने काम करणार असून, रखडलेल्या रस्त्यांचे काम तातडीने पूर्ण होण्यास मदत मिळणार आहे.या समितीचे वैशिष्ट्य म्हणजे यात केवळ शासकीय अधिकारीच नसून, ग्रामीण भागाची भौगोलिक परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या अडीअडचणींची जाण असलेल्या पाच प्रगतीशील शेतकऱ्यांचाही समावेश करण्यात आला आहे. यामध्ये अशोक पुंडलिकराव विजयकर (आष्टी), प्रशांत वासुदेवराव काकपुरे (साहूर, ता. आष्टी), राजेंद्र गुलाबराव पावडे (रोहणा, ता. आर्वी), सचिंद्र ज्ञानेश्वरराव कदम (देऊरवाडा, ता. आर्वी), जगदीश सुखदेवराव डोळे (मेटहिरजी, ता. कारंजा) यांचा समावेश आहे. या अभ्यासू सदस्यांच्या अनुभवामुळे मतदारसंघातील सर्वात गरजू आणि वंचित भागातील शेत रस्त्यांना प्राधान्य दिले जाईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.पेरणीपासून पीक काढणीपर्यंत खते, बी-बियाणे आणि मजुरांची ने-आण करण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागते. चिखल तुडवत शेतात जाण्याचे दिवस आता संपणार असून, पाणंद रस्त्यांमुळे कायमस्वरूपी तोडगा निघणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार, या समितीत तहसीलदार, गट विकास अधिकारी, भूमी अभिलेख अधीक्षक आणि बांधकाम विभागाचे अभियंते देखील सदस्य म्हणून कार्यरत राहतील. आमदार सुमित वानखेडे यांच्या नेतृत्वात ही समिती आता आर्वी, आष्टी आणि कारंजा तालुक्यातील बळीराजाला मोठा दिलासा देण्यासाठी सज्ज झाली आहे.

घाबरुं नका..! काम न करणाऱ्या आमदार, खासदारांनाही बरखास्त करता येतं !

परभणी / दत्तात्रय कराळे

एकदा निवडून गेलेले आमदार, खासदार पाच पाच वर्षे आपल्या मतदारसंघात फिरकत नाहीत. ज्यांनी विकास कामांच्या आशेने निवडून दिलेलं असतं त्या मतदारांना तोंड सुध्दा न दाखवणारे महान मूर्ती असे कितीतरी आहेत. नियोजित विकास कामांना ठेंगा दाखवत करोडोंची काळी माया जमवत साऱ्यांची संख्या दिवसेंदिवस अधिकच वाढू लागली आहे. किंबहुना त्याच काळ्या कमाईच्या बळावर निगरगट्ट बनलेले हेच आमदार, खासदार कालांतराने भयंकर शेफारले जातात, परिणामी जनता भयभीत बनली जाते आणि अशा लोकप्रतिनिधींची कमाई मात्र शिगेला पोहोचली जाते. त्याचाच परिपाक म्हणून जनतेने न झालेल्या कामांची विचारणा केलीच तर मात्र अशा लोकप्रतिनिधींचे कथित भाडोत्री गुंड प्रश्नकर्त्या जनतेवरवरच दबंगाई करीत असतात. प्रसंगी द्वेषमूलक भावनेतून जबरी हल्ले सुध्दा करतात. नाईलाज म्हणून भीक नको परंतु कुत्र्याला आवर या उक्तीप्रमाणे विकास नको परंतु तुझी दादागिरी तर मुळीच नको, असं म्हणायची पाळी येऊन ठेपली जाते. तथापि आता मात्र कोणालाही घाबरण्याची मुळीच गरज पडणार नाही. परंतु त्यासाठी 'राईट टू रिकॉल' कायद्याचा अंमल करावा लागणार आहे. मग त्यासाठी त्या कायद्याला सार्वभौम अशा भारतीय कायदेमंडळात मंजुरी मिळवावी लागणार आहे. महामहीम राष्ट्रपतींची मान्यता घेऊन पुन्हा त्यावर त्या त्या राज्यांची मान्यता मिळवणे भाग पडू शकते. त्यालाच 'राईट टू रिकॉल' कायदा म्हणतात. त्याच कायद्यान्वये आमदार व खासदारांनाही हटवता येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ग्रामपंचायत स्तरावर ही व्यवस्था या आधीपासूनच अस्तित्वात आहे. परंतु त्याचा फारसा कोणी गांभीर्याने विचार करताना आढळून येत नाही. दरम्यान, राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी ही मागणी आता संसदेत लावून धरली आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य



प्रदेश आणि राजस्थान यांसारख्या राज्यांमध्ये ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसभेच्या माध्यमातून प्रतिनिधींना हटवण्याची तरतूद आजही आहे. तशीच व्यवस्था विधानसभा आणि लोकसभेसाठी करण्यात यावी अशी मागणी मागील काही दिवसांपासून वरिष्ठ सभागृहात केली जातेय. काम न करणाऱ्या आणि आश्वासने न पाळणाऱ्या खासदार आणि आमदारांना मतदारांनी पदावरून हटवण्याची ताकद देणारा 'राईट टू रिकॉल हा कायदा देशात सर्वत्र लागू करण्यात यावा, अशी मागणी राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी लावून धरली आहे. राघव चड्ढा हे आम आदमी पार्टीचे राज्यसभा खासदार आहेत. बजेट सत्र २०२६ दरम्यान शून्य प्रहरात बोलताना राघव चड्ढा यांनी लोकशाहीतील एका मोठ्या त्रुटीवर बोट ठेवले आहे. देशातील लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी या नवीन व्यवस्थेची गरज असल्याचे म्हटलं आहे. निवडणुकांआधी नेते जनतेच्या मागे असतात, पण निवडणूक जिंकल्यावर जनता नेत्यांच्या मागे धावत असते. ही परिस्थिती बदलणे आवश्यक आहे. पाच वर्षांचा कार्यकाळ खूप मोठा असतो. जर एखाद्या क्षेत्रातील जनतेने चुकीचा प्रतिनिधी निवडला, तर त्यांना पाच वर्षे पश्चातापाशिवाय दुसरा पर्याय नसतो. त्यामुळे 'राईट टू रिकॉल' हा कायदा तशा राजकारण्यांविरुद्धचे शस्त्र नसून ते लोकशाहीचा विमा असल्याचे राघव चड्ढा म्हणाले. कॅनडा आणि स्वित्झर्लंडसह जगातील २४ हून अधिक लोकशाही देशांमध्ये ही व्यवस्था अस्तित्वात आहे. त्याचप्रमाणे भारतातही ही व्यवस्था लागू करण्यात आली पाहिजे. दरम्यान भारतातही राष्ट्रपतींवर महाभियोग चालवणे, उपराष्ट्रपतींना हटवणे किंवा न्यायाधीशांना पदावरून हटवण्यासाठी कायदे आहेत. त्याशिवाय सरकारविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणण्याची देखील तरतूद आहे. मग मतदारांना काम न करणाऱ्या प्रतिनिधींना परत बोलावण्याचा आणि न काम करणाऱ्यांना हटवण्याचा अधिकार का नसावा ? असा सवाल राघव चड्ढा यांनी उपस्थित केला आहे. यावेळी राघव चड्ढा यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांचा दाखला दिला आहे. कर्नाटक, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि राजस्थान या राज्यांमध्ये ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसभेच्या माध्यमातून प्रतिनिधींना हटवण्याची तरतूद आहे. अशीच व्यवस्था संसद आणि विधानसभेसाठीही लागू करण्याची वेळ आल्याच असे चड्ढा म्हणाले. एकूणच काय तर खासदार चढ्ढा यांनी लावून धरलेली ही मागणी खळबळजनक असून ती काम न करणाऱ्या किंवा आश्वासन पूर्ती न करता घोर फसवणूक करणाऱ्या आमदार, खासदारांसाठी निश्चितपणे धक्कादायक अशीच म्हणता येईल. तथापि ती मागणी सार्वभौम अशा दोन्ही सभागृहात मंजूर करण्यात आली तर मात्र निष्क्रिय लोकप्रतिनिधींवर मोठ्या प्रमाणात वचक बसला जाईल, हे जरी खरं असलं तरी आजच्या घडीला बोकाळलेली भ्रष्टाचारी प्रणाली 'राईट टू रिकॉल' सारखा कायदा खरोखरच लागू करु शकेल का, हा खरा प्रश्न आहे. तथापि विद्यमान सरकार यासाठी तयार होत नसले तरी यासाठी पक्षीय राजकारण न बघता सर्वपक्षीय विरोधकांनी हा कायदा लागू करण्यासाठी एकोपा निर्माण केला पाहिजे. दबाव आणून सरकारची कोंडी केली पाहिजे. ते जरी आमदार, खासदार असले तरी त्यांच्यावरही या कायद्याची भीती राहिली जाणार आहे. लोकांना विकास हवा आहे. नव्हे, तो त्यांचा घटनादत्त असा अधिकार आहे. निवडून आल्यानंतर विकास करण्याऐवजी भ्रष्टाचारी मार्गाने काळी पूंजी जमविलीच पाहिजे, असं कायद्यात कुठंही नमूद नाहीये. तरीही लोकहिताचा तो कायदा धाब्यावर बसवून खुलेआम लोकांची फसवणूक केली जाते आहे. त्यापेक्षा मनाची नाही तर जनाची लाज तरी अशा लोकप्रतिनिधींनी बाळगणे अपेक्षित नसावे का ? संसदेतील विरोधी पक्षनेते खा. राहूल गांधी, खा.प्रियांका गांधी या दोघांनीही हा महत्वपूर्ण असा हा मुद्दा लेफ्टनंट नरवणे लिखित पुस्तकासारखा लावून धरणे गरजेचे आहे. जे जे स्वतःला राजकीय चिकित्सक व मुरब्बी राजकारणी समजतात, त्या सर्व नेत्यांनी सरकारला सळो का पळो करून सोडणे आवश्यक ठरणार आहे. तर आणि तरच निष्क्रिय लोकप्रतिनिधींवर वचक बसला जाऊन कायमची भीती राहिली जाईल एवढे निश्चित..!